




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १२४ * नांदेड * सोमवार, दि. ११ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# भोंदू खरात प्रकरणी रूपाली चाकणकरांची चौकशी; 'एसआयटी' समोर नोंदवला जबाब



**नाशिक (प्रतिनिधी)** – भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे वादात अडकलेल्या रूपाली चाकणकर यांची नाशिक एसआयटीसमोर चौकशी सुरू झाली आहे. रविवारी सकाळी चाकणकर यांनी पुण्याहून नाशिकला जात तपास यंत्रणेसमोर हजेरी लावली. रूपाली चाकणकर या वकिलांसोबत चौकशीसाठी पोहचल्या. महिला आयोगाच्या अध्यक्ष म्हणून चाकणकर यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केला होता असा आरोप आहे. त्याशिवाय खरात यांच्या शिवानिका संस्थाच्या विश्वस्तपदी रूपाली चाकणकर होत्या. त्यामुळे आर्थिक व्यवहारांबाबतही चाकणकर यांची चौकशी करण्यात येत आहे.

एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते या रूपाली चाकणकर यांची चौकशी करीत आहेत. खरातशी संबंधित आर्थिक व्यवहार आणि त्यांच्यावर झालेल्या आरोपाबाबत ही चौकशी होत आहे. या चौकशीला हजर होण्यापूर्वी चाकणकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या की, आज जो एसआयटीचा तपास सुरू आहे, त्यांना काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत, ती देण्यासाठी मी आली आहे. तपासात माझे पूर्णपणे सहकार्य राहील. तपास यंत्रणेला जी काही मदत लागेल ती निश्चितपणे केली जाईल असं त्यांनी म्हटलं आहे.

तर खरात प्रकरणात राज्याच्या मंत्रिमंडळातील ४ मंत्र्यांचा समावेश आहे. या मंत्र्यांची हकालपट्टी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवणार असून भोंदू खरातकडून सगळी माहिती गोळा करून त्याचा एन्काऊंटर केला जाईल असा दावा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे. मात्र ४ मंत्र्यांची नावे आहेत, त्यांचा यात सहभाग असेल तर नाना पटोलेंनी ती नावे मुख्यमंत्र्यांकडे द्यावीत किंवा जाहीर करावीत, याची निश्चितपणे चौकशी केली जाईल. मात्र ठोकताळ्यावर अंदाजपणे नावे सांगणे आणि प्रत्यक्ष गुन्ह्यात सहभागी असणे हा भाग वेगळा आहे. त्यामुळे ही नावे मुख्यमंत्र्यांना द्यावीत. माध्यमांसमोर जायचे असेल तर ती नावे उघडही करावी असा टोला मंत्री संजय शिरसाट यांनी लगावला आहे.

दरम्यान, तपास यंत्रणेत पतसंस्थांच्या आर्थिक गैर-व्यवहाराची चौकशी होईल, परंतु ज्या राजकीय नेत्यांचा या प्रकरणात सहभाग आहे त्यांची चौकशी कोण करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. माझ्याकडे आलेली सगळी माहिती, त्यातील आर्थिक गैरव्यवहार हे सगळे एसआयटीकडे पाठवले तरीही त्याची चौकशी झाली नाही, असा आरोप दमानिया यांनी केला आहे.

# अंदमानात यंदा मान्सूनचे लवकर आगमन



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – राज्यात उन्हाचा तडाखा आणि कोकणात असह्य उकाड्यामुळे नागरिक हैराण झालेले असतानाच एक अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. यंदा अंदमानात मान्सूनचे आगमन निर्धारित वेळेच्या आधीच होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. 'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला मोठी चालना मिळाली असून तो लवकरच अंदमानात दाखल होईल.

हवामान तज्ज्ञांच्या मते, १२ आणि १३ मे दरम्यान विषुववृत्तीय प्रदेशाजवळ आणि बंगालच्या उपसागराच्या दक्षिण-पश्चिम भागात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रणालीमुळे विषुववृत्तीय वाऱ्यांचा प्रवाह अधिक मजबूत होईल, परिणामी मान्सून सरासरी तारखेच्या आधीच अंदमानात धडकू शकतो. यापूर्वी मान्सून १४ ते २२ मे दरम्यान येण्याचा अंदाज होता, मात्र आता हे आगमन त्याआधीच होण्याची चिन्हे आहेत.

साधारणपणे मान्सून अंदमा-नात दाखल झाल्यानंतर त्याचा कोकणापर्यंतचा प्रवास २१ दिवसांचा असतो. अंदमानात लवकर आगमन झाल्यास, महाराष्ट्रातही मान्सून वेळेवर किंवा वेळेआधीच पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागानेही १४ ते २० मे दरम्यान अंदमानच्या समुद्रात नैर्ऋत्य वारे वाहू लागतील, असा अंदाज दिला आहे. तर स्कायमेटने बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला चालना मिळून सरासरी तारखेच्या आधीच मान्सून अंदमानमध्ये दाखल होईल, अशी शक्यता वर्तवली आहे.

एकीकडे मान्सूनच्या आनंदाची बातमी येत असताना, दुसरीकडे राज्याला उष्णतेच्या लाटेने ग्रासले आहे. पालघर, कल्याण आणि डोंबिवलीत तर तापमानाने ४० ते ४४ अंशांचा टप्पा ओलांडला आहे. कोकणात आर्द्रतेमुळे उकाड्याने नागरिक घामाघूम झाले आहेत. तर रायगड जिल्ह्यात पारा ३९ अंशांवर पोहोचलेला असतानाच, शनिवारी संध्याकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. दुर्दैवाने, वीज पडून एका १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे एकीकडे मान्सूनची प्रतीक्षा असताना दुसरीकडे अवकाळीच्या सावटाने चिंतेचे वातावरणही आहे. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे वाशिम जिल्ह्यातील अनेक जलस्रोत आटल्याने ३३ गावांना पाणीटंचाईचा फटका बसला आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने २९ विहिरी आणि ६ खाजगी बोअरवेलचे अधिग्रहण केले असून, त्याद्वारे संबंधित गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. मंगरूळपीर तालुक्यात सर्वाधिक १० गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे.

## खरात प्रकरणात ४ बड्या मंत्र्यांचा सहभाग; नाना पटोलेंचा आरोप

**नाशिक (प्रतिनिधी)** – राज्य सरकारवर अत्यंत गंभीर आणि खळबळजनक आरोप नाना पटोले यांनी केले आहेत. या प्रकरणात सरकारमधील चार बड्या मंत्र्यांचा सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला आहे. नाना पटोले यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

ज्याप्रमाणे एपस्टीनचा मृत्यू झाला, त्याचप्रमाणे अशोक खरातलाही माहिती बाहेर येऊ नये म्हणून मारले जाईल, अशी भीती नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाचा तपास केल्यास सरकार-मधील चार मंत्री यात अडकतील, असेही ते म्हणाले. लवकरच या मंत्र्यांची नावे पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांना कळवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोषी आढळणाऱ्या चारही मत्र्यांची मंत्रिमंडळातून तत्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी त्यानी केली आहे.

# युक्रेनसोबत शांतता करार करण्यासाठी पुतिन यांची तयारी?

**मास्को (वृत्तसंस्था)** – रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी शनिवारी एक महत्त्वपूर्ण संकेत दिला आहे. त्यांनी सांगितले की, युक्रेनसोबत सुरू असलेले युद्ध पूर्णपणे संपवण्यासाठी ते युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्स्की यांची तिसऱ्या देशात भेट घेण्यास तयार आहेत. पुतीन यांनी प्रथमच रशियाबाहेर इतर कोणत्याही देशात भेट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

'विक्टरी डे' परेडनंतर माध्यमांशी संवाद साधताना पुतीन यांनी स्पष्ट केले की, त्यांनी कधीही आपल्या युक्रेनी समकक्षासोबत चर्चेला नकार दिलेला नाही. मात्र, या भेटीसाठी त्यांनी एक महत्त्वाची अटही ठेवली आहे. त्यांच्या मते, तिसऱ्या देशात बैठक तेव्हाच होऊ शकते, जेव्हा दोन्ही देशांमध्ये पूर्ण आणि दीर्घकालीन शांतता करार निश्चित होईल. पुतीन यांच्या म्हणण्यानुसार ही भेट केवळ करारावर स्वाक्षरी करण्यासाठी असेल, चर्चा करण्यासाठी नव्हे. त्यांनी असेही सांगितले की, जर युक्रेनच्या बाजूने भेटीची इच्छा असेल, तर ते मॉस्कोमध्येही येऊ शकतात. कोणत्याही कराराचा हा अंतिम टप्पा असावा, चर्चेची सुरुवात नव्हे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रशियन राष्ट्राध्यक्षांनी यावर भर दिला की, प्राथमिक चर्चा तज्ज्ञांनीच करायला हव्यात. त्यांनी २०१४ आणि २०१५ मध्ये बेलारूसमध्ये झालेल्या 'मिन्स्क करारां'चा उल्लेख करत सांगितले की, अशा चर्चा अनेक तास चालतात; मात्र त्यातून ठोस निष्कर्ष निघत नाहीत. या करारांचा उद्देश युक्रेनच्या डोनबास भागातील हिंसाचार थांबवणे हा होता, पण ते अपयशी ठरले होते. यावेळी सर्व मुद्दे आधीच स्पष्ट व्हावेत, जेणेकरून राष्ट्राध्यक्ष केवळ औपचारिकता आणि स्वाक्षरीसाठी भेटतील, अशी पुतीन यांची भूमिका आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेले हे युद्ध आता पाचव्या वर्षात प्रवेशले आहे. यापूर्वी सप्टेंबर २०२५ मध्येही पुतीन यांनी चीन दौऱ्यानंतर झेलेन्स्की यांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, ही भेट मॉस्कोमध्ये होऊ शकते, मात्र ती युक्रेनच्या घटनात्मक चौकटीत असावी आणि त्यातून ठोस परिणाम निघायला हवा.आता पुतिन यांनी रशियाबाहेर भेटीचा दिलेला प्रस्ताव शांततेच्या दिशेने नवा मार्ग उघडू शकतो.

# मुंबई-पुणे प्रवासादरम्यान सुप्रिया सुळे यांच्या वाहनाला अपघात



**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या गाडीचा पुणे-मुंबई महामार्गावर अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून सुप्रिया सुळे आणि त्यांच्या वाहनातील सर्वजण सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यावरून मुंबईकडे जात असताना महामार्गावर एका भरधाव वाहनाने निष्काळजीपणे गाडी चालवत सुप्रिया सुळे यांच्या वाहनाला धडक दिली. अचानक झालेल्या या अपघातामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही.

या घटनेनंतर स्वतः सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत अपघाताची माहिती दिली. त्यांनी संबंधित वाहनाचा क्रमांकही जाहीर केला. जीजे १३ सीएफ ५२५७ या क्रमांकाच्या वाहनचालकाने अतिवेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवत आमच्या गाडीला बाजूने धडक दिली. सुदैवाने सर्वजण सुरक्षित आहोत. सीट बेल्ट लावला असल्यामुळे मोठा अनर्थ टळला, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या अपघातानंतर महामार्गांवरील वाढत्या बेदरकार वाहनचालकांबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात आहे. अतिवेग, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि निष्काळजी वाहनचालकांमुळे रोज अनेक अपघात घडत असल्याचे वास्तव पुन्हा समोर आले आहे.

# विहीर खचल्यामुळे वडिलांसह दोन मुलांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील धानोरा येथे शनिवार, दि. ९ मे रोजी रात्री एक अत्यंत हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. विहिरीत उतरून मोटार पंप बसवण्याचे काम सुरू असताना अचानक विहीर खचली आणि त्याखाली दबून एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी अंत झाला. बाजीराव सर्जेराव काकडे, आजीनाथ बाजीराव काकडे आणि शाम बाजीराव काकडे अशी मृतांची नावे असून, या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

रात्री साडे नऊच्या सुमारास घडलेल्या या अपघाताने गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, एकाच वेळी घरातील तीन आधारस्तंभ गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात धानोरा गावात अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. शेतातील विहिरीत मोटार पंप बसवण्याचे काम सुरू असताना अचानक विहिरीचा भाग कोसळल्याने एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. बाजीराव सर्जेराव काकडे, त्यांचे पुत्र आजीनाथ काकडे आणि शाम काकडे अशी मृतांची नावे आहेत. रात्री साडेनऊच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. एका क्षणात कुटुंबातील तीन आधारस्तंभ गमावल्याने काकडे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाजीराव काकडे आणि त्यांची दोन्ही मुले शेतातील विहिरीत उतरून मोटार पंप बसवण्याचे काम करत होते. त्याचवेळी अचानक विहिरीचा काही भाग खचला आणि तिघेही माती व दगडांच्या ढिगाऱ्याखाली अडकले. मोठा आवाज झाल्यानंतर ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मात्र ढिगाऱ्याखाली गंभीररीत्या दबल्या गेल्याने तिघांचाही जागीच मृत्यू झाला. मेहनती आणि कुटुंबासाठी झटणाऱ्या या तिघांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने गावकऱ्यांनाही मोठा धक्का बसला आहे.

या दुर्घटनेनंतर धानोरा गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळीचे वातावरण आहे. आज सकाळी ११ वाजता धानोरा येथील स्मशानभूमीत तिघांवर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. काकडे कुटुंब गावात प्रेमळ आणि मदतीला धावून जाणारे म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने संपूर्ण गाव हळहळ व्यक्त करत असून गावाने आपली माणसं गमावल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## पुढील वर्षभर सोनं खरेदी करू नका, पेट्रोल डिझेल जपून वापरा – नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत देशासह जगातील अनेक देश काही आव्हानांचा सामना करत आहेत. विविध देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक संकटाला तोंड देत असताना सुजाण नागरिक म्हणून आपण काही गोष्टी करायला हव्यात. पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळावी, परदेशी प्रवास टाळावा तसेच पेट्रोल डिझेलचा वापरही कमीत कमी करावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केले.


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हैदराबादमध्ये एका जाहिर सभेला संबोधित केले. यावेळी जागतिक संकट आणि भारताची भूमिका याबद्दल त्यांनी मते मांडली. यावेळी त्यांनी देशवासियांना उद्देशून त्यांनी प्रमुख नऊ आवाहने केली. प्रामुख्याने सोने खरेदी टाळावी आणि पेट्रोल डिझेलचा वापर कमीत कमी करावा, या मोदींच्या आवाहनामुळे पुढील काळात नेमकी काय परिस्थिती ओढावणार आहे, याबद्दल लोकांच्या मनात संशयाचे धुके दाटले आहे.

# हिमंता बिस्वा सरमांकडेच आसामची धुरा; १२ मे रोजी होणार शपथविधी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– हिमंता बिस्वा सरमा हे आसामचे पुढील मुख्यमंत्री असतील. भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली. जे. पी. नड्डा यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. हिमंता १२ मे रोजी सकाळी ११ वाजता सलग दुसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. ४ मे रोजी जाहीर झालेल्या निकालांनुसार, भाजपने राज्यातील १२६ पैकी ८२ जागा जिंकून दणदणीत विजय मिळवला होता. शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे वरिष्ठ नेतृत्व आणि एनडीएचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. हिमंता यांचा हा राज्याभिषेक ईशान्य भारतात पक्षाचा प्रभाव आणखी मजबूत करणारा मानला जात आहे.

आसाम भाजपचे अध्यक्ष दिलीप सैकिया म्हणाले, आम्ही दुपारपर्यंत सरकार स्थापन करण्याच्या आमच्या दाव्याबद्दल राज्यपालांना कळवू. १२ तारखेला होणाऱ्या शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू आहे. हा एक ऐतिहासिक क्षण असेल, कारण पंतप्रधान मोदीच्या उपस्थितीत हिमंता १०२ आमदारांसोबत शपथ घेतील.

२०२३ मध्ये आसाममध्ये मतदारसंघ पुनर्रचना झाली, ज्यामध्ये विधानसभा जागांच्या सीमा नव्याने आखण्यात आल्या. अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती यांच्यासाठी राखीव जागा आणि बोडोलँड आदिवासी प्रदेशातील जागा वाढल्या, परंतु मुस्लिमबहुल जागा ४१ वरून २६ पर्यंत कमी झाल्या. २०११ च्या जनगणनेनुसार, आसामच्या लोकसंख्येत मुस्लिमांचे प्रमाण ३४ टक्के होते. आताच्या अंदाजानुसार हे प्रमाण जवळपास ४० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. तरीही, त्यांच्या जागा कमी झाल्या आहेत. भाजपने नॉर्थ-ईस्ट डेमोक्रॅटिक अलायन्ससोबत निवडणूक लढवली. भाजपच्या ९० उमेदवारांमध्ये एकही मुस्लिम उमेदवार नव्हता. मित्रपक्षांनी ३६ पैकी १३ मुस्लिम उमेदवार उभे केले. दुसरीकडे, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाजोत आघाडीने २२ मुस्लिम उमेदवार उभे केले. राजकीय विश्लेषकांच्या मते, नवीन सीमांमुळे मुस्लिमबहुल भागांचा प्रभाव मर्यादित झाला आणि ज्या जागांवर आसामी मुस्लिमांची संख्या कमी होत होती, त्या जागांची पुनर्रचना झाली. यामुळे ज्या जागांवर भाजप पूर्वी कमकुवत होता, तिथे हिमंता यांना फायदा झाला.



# जोसेफ विजय तामिळनाडूचे नवे मुख्यमंत्री; जनतेचा जल्लोष अन् आई-वडील भावुक



**चेन्नई (वृत्तसंस्था)** – अखेर पाच दिवसांच्या नाट्यमय घडा-मोडींनंतर रविवारी तामिळनाडूत शपथविधी पार पडला आहे. जोसेफ विजय यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. राज्यपाल विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक, नेते उपस्थित होते. विजय यांनी शपथ घेताना जमलेल्या जनतेने टाळ्या, शिट्या वाजवून एकच उत्साह व्यक्त केला, तर विजय हे मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असताना त्यांचे आई-वडील भाऊक झाल्याचे दिसून आले.

जोसेफ विजय यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. राज्यपाल विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यानंतर विजय यांच्यानंतर आनंद यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. विजय यांच्यानंतर टीव्हीकेचे आमदार थिरू एन. आनंद यांनी तामिळनाडूमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. ते विजय यांच्या जवळचे मानले जातात. त्यानंतर विजय यांचे निकटचे सहकारी आणि विल्लिवाक्कम मतदारसंघाचे आमदार अधव अर्जुन यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. ते बास्केटबॉल फेडरेशनचे अध्यक्षही आहेत. त्यांनी डीएमकेचे कार्तिक मोहन यांचा पराभव केला. टीव्हीकेचे महासचिव अरुण राज यांनी शपथ घेतली. ते तिरुचेंगोडे मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यांना प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असून, तो विजय यांच्या सरकारसाठी उपयुक्त ठरेल. सेंगोत्तैयन हे विजय यांच्या सरकारमध्ये मंत्री झाले आहेत. राज्यपालांनी त्यांना शपथ दिली. तामिळनाडू एआयएडीएमकेचे आठ वेळा आमदार राहिलेले सेंगोत्तैयन टीव्हीकेमध्ये सामील झाले आणि जिंकले. त्यांनी जयललिता यांच्या सरकारमध्येही मंत्री म्हणून काम केले होते. टीव्हीकेसाठी निवडणूक व्यवस्थापन सांभाळणारे आणि विजय यांच्या निकटवर्तीयांपैकी एक मानले जाणारे पी. वेंकटरामन यांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली. तिरुप्पनकुंद्रम मतदारसंघाचे आमदार आणि टीव्हीकेच्या सोशल मीडिया टीमचे उपाध्यक्ष आर. निर्मल कुमार यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

# युपीत मंत्रिमंडळाचा विस्तार; नव्या सहा चेहऱ्यांना संधी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– योगी मंत्रिमंडळाचा दुसऱ्यांदा विस्तार झाला. माजी प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र चौधरी यांनी सर्वप्रथम कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. यानंतर, समाजवादी पक्षाविरुद्ध बंड करणारे आ. मनोज पांडे यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. अजित पाल, सोमेंद्र तोमर आणि कृष्ण पासवान यांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. कैलाश राजपूत आणि सुरेंद्र दिलेर यांनीही मंत्री म्हणून शपथ घेतली. हंसराज विश्वकर्मा यांनीही राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. नवनियुक्त मंत्र्यांमध्ये एक ब्राह्मण, तीन ओबीसी समुदायाचे आणि दोन दलित आहेत.

पदोन्नती मिळालेल्या मंत्र्यांमध्ये अजित पाल आणि सोमेंद्र तोमर यांचा समावेश आहे. ते यापूर्वी स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री होते. सपाच्या बंडखोर नेत्या पूजा पाल यांनाही मंत्री केले जाईल अशी चर्चा होती, पण नंतर त्यांचे नाव वगळण्यात आले. भूपेंद्र चौधरी यांना सार्वजनिक बांधकाम खाते दिले जाऊ शकते, अशीही चर्चा आहे. जितीन प्रसाद केंद्रात मंत्री झाल्यापासून हे खाते योगींकडे आहे.

यापूर्वी, शनिवारी संध्याकाळी सुमारे साडेसहा वाजता मुख्यमंत्री योगी यांनी राज्यपाल आनंदीबेन पटेल यांची भेट घेतली. सुमारे ४५ मिनिटे चर्चा केल्यानंतर योगींनी नवनियुक्त मंत्र्यांची यादी राज्यपालांकडे सुपूर्द केली. सध्या योगींसह उत्तर प्रदेश सरकारमध्ये एकूण ५४ मंत्री आहेत. याचा अर्थ ६ पदे रिक्त आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांच्या अगदी आधी, ५ मार्च २०२४ रोजी योगी मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार झाला होता.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# तृणमूल काँग्रेस वाताहत

भारतीय लोकशाहीची खरी ताकद ही तिच्या वैविध्यात आणि सशक्त विरोधकांमध्ये आहे. मात्र अलीकडील पाच राज्यांच्या निवडणुकांनी देशाच्या राजकारणात एक वेगळीच दिशा स्पष्ट केली आहे. काही राज्यांमध्ये सत्ताविरोधी लाट प्रभावी ठरली, तर काही ठिकाणी ती पूर्णपणे निष्प्रभ झाली. लोकशाहीत सशक्त विरोधक नसतील तर सत्ताधारी पक्ष हुकूम शाहीकडे झुकण्याचा धोका वाढतो. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला. हे त्यांच्या कर्तृत्वाचे फळ आहे. केरळमध्ये डाव्या आघाडीला जनतेने नाकारले, तर तामिळनाडूत डीएमकेलाही सत्तेपासून दूर व्हावे लागले. पण दुसरीकडे आसाममध्ये हिमंता बिस्वा शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. जनतेने भाजपवर विश्वास दाखवला. यावरून स्पष्ट होते की, आता निवडणुका केवळ सत्ताविरोधी लाटेवर जिंकल्या किंवा हरल्या जात नाहीत; तर त्या अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापित केल्या जात आहेत. आज भारतीय राजकारणात भाजपने केवळ एक पक्ष म्हणून नव्हे, तर एक व्यापक राजकीय यंत्रणा म्हणून स्वतः ची उभारणी केली आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली भाजपने निवडणूक व्यवस्थापन, प्रचारतंत्र, सोशल मीडिया, संघटनशक्ती आणि सरकारी यंत्रणांचा प्रभावी वापर करून विरोधकांना जवळपास नामोहरम करण्याची रणनीती राबवली आहे. यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे प्रादेशिक पक्षांचे कमकुवत होणे. तृणमूल काँग्रेस, डीएमके, समाजवादी पक्ष, शिवसेना किंवा आम आदमी पक्ष यांसारखे पक्ष हे भारतीय संघराज्य व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. हे पक्ष केवळ राजकीय नाहीत, तर प्रादेशिक अस्मिता, भाषा आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. जर हे पक्ष हळूहळू दुर्बल होत गेले, तर भारतीय लोकशाहीतील संतुलन धोक्यात येऊ शकते, हेही तितकेच खरे. या पक्षांमध्ये भ्रष्टाचारासारखे प्रचंड दोष आहेत, परंतु कोण धुतल्या तांदळासारखा आहे? हा मोठा प्रश्न आहे. याचबरोबर डाव्या विचारसरणीचाही भारतात जवळपास अस्त होताना दिसत आहे. एकेकाळी ज्योती बसू, ईएमएस नंबूदरीपाद, हर्किशन सिंग सुरजीत यांसारखे नेते देशाच्या राजकारणावर प्रभाव टाकत होते. सोव्हिएत संघाच्या काळात कम्युनिझम ही केवळ विचारसरणी नव्हती, तर जगातील भांडवलशाहीला दिलेले मोठे आव्हान होते. भारतातील तरुण पिढीही त्या विचारांनी प्रेरित होत होती. परंतु जागतिकीकरण, बाजारव्यवस्था आणि बदलत्या सामाजिक वास्तवामुळे डाव्या विचारसरणीची पकड सैल होत गेली. आज परिस्थिती अशी आहे की, पश्चिम बंगाल आणि केरळसारख्या डाव्यांच्या बालेकिल्ल्यांमध्येही त्यांचे अस्तित्व संकटात आले आहे. अनेक विरोधी पक्ष आज केंद्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापराचा आरोप करतात. ईडी, सीबीआय किंवा आयकर विभागाच्या कारवाया निवडक पद्धतीने होत असल्याचे चित्र उभे केले जाते. यामुळे लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होण्याचा धोका आहे. इतिहास पाहिला तर काँग्रेसच्या दीर्घकाळच्या सत्तेविरोधात राम मनोहर लोहिया यांनी अँटी काँग्रेसिझमची हाक दिली होती. याचे स्मरण अद्यापही जनतेला आहे. आजही काँग्रेसची कारकीर्द कोणत्या धोरणावर अवलंबून आहे हे जनतेला माहीत आहे. म्हणूनच या पक्षाची सातत्याने पडझड होते आहे. मात्र विरोधकांचीही चूक तितकीच मोठी आहे. अनेक पक्ष अजूनही जुन्या पद्धतीने निवडणुका लढवत आहेत. संघटनशक्ती, तंत्रज्ञान, बुथ व्यवस्थापन आणि प्रभावी नेतृत्व यामध्ये ते भाजपपेक्षा खूप मागे आहेत. केवळ मोदीविरोधी भाषणांनी निवडणुका जिंकता येत नाहीत. विरोधकांनी एकत्र येऊन स्पष्ट पर्याय निर्माण करणे, स्थानिक प्रश्नांवर काम करणे आणि जनतेत विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. बहुमत प्राप्त झाले असले तरीही भाजपसमोर मोठे आव्हान आहे. केवळ निवडणुका जिंकणे पुरेसे नाही; तर विकास, रोजगार, उद्योग, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था यामध्ये परिणामकारक कामगिरी दाखवावी लागेल. विशेषतः पश्चिम बंगालसारख्या राज्यात उद्योगधंदे आणणे, सीमावर्ती प्रश्न सोडवणे आणि हिंसाचारमुक्त वातावरण निर्माण करून तेथील हिंदूंना सुरक्षित असल्याची भावना निर्माण करणे, ही मोठी जबाबदारी असेल. भारतीय लोकशाही आज एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. एका बाजूला अत्यंत शक्तिशाली सत्ताधारी पक्ष आणि दुसऱ्या बाजूला विस्कळीत विरोधक अशी स्थिती आहे. लोकशाही टिकवण्यासाठी केवळ मजबूत सरकार पुरेसे नसते; तर तितकाच सक्षम विरोधी पक्षही आवश्यक असतो. अन्यथा लोकशाही हळूहळू एकपक्षीय व्यवस्थेकडे झुकण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य



आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती वाटणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते जर व्याभिचार करीत असतील तर...मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आईवडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल.

'झोपले का बाळांनो, उठा लवकर. आज शाळेत जायचंय.' एका अशिक्षित आईचे उद्गार. ती अशिक्षित होती. परंतु तिला आपल्या बाळाची काळजी होती. तिला वाटत होतं की ते बाळ. ते आपलं आहे व शिकायला हवं. तो शिकून मोठा व्हायला हवा. त्याला आपल्यासारखं उन्हात राबावं लागू नये.

ती आई अशिक्षित असली तरी तिला शिक्षणाचं महत्व कळलं होतं. आज त्याच आईनं आपल्या बाळाच्या मागं लागून लागून त्यांना उच्च शिक्षण शिकवलं होतं. तिला नोकरी लागतांना वशिला हवा वा ओळखपारख हवी हेही माहीत नव्हतं. आज तिची मुलं उच्चशिक्षित झाली होती व चांगल्या हुद्यावर नोकरीलाही लागली होती.

आईवडील...सर्वांचेच आईवडील शिकवतात आपल्या बाळाला. आपल्या बाळाचं भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना उन्हातून सावलीत नेतात. त्यांच्या पुस्तकांची इच्छा पुरवतात. वाटतं की ते मुल उच्चशिक्षण शिकावं. परंतु सर्वच आईवडीलांची मुलं उच्चशिक्षित होतात का? याचं उत्तर नाही असंच येतं. काहींची मुलं उच्चशिक्षित होतात आणि काहींची. अजिबात शिकत नाहीत. त्याचं कारण काय?

मुलांचं उच्चशिक्षित होणं न होणं. यासाठी अनेक कारणं जबाबदार असतात. त्यातील मुख्य एक कारण असतात, त्या मुलांचेच आईवडील. मुलांच्या आईवडीलांच्या सवयी जर वाईट असतील, तर ती मुलं देखील वाईट मार्गाकडं नकळत जातच असतात. उदाहरण द्यायचं झाल्यास आजच्या काळातील मोबाईलचं देता येईल. आजचे आईवडील मुलांकडून अपेक्षा करतात की त्यांनी जास्त मोबाईल पाहू नये आणि स्वतःच मुलांसमक्ष मोबाईल पाहात बसतात. तेच पाहातं मुल व तेही मोबाईल पाहायला बसतं आणि मोबाईल हिसकल्यास जोरजोरानं रडतं. मग ते मुल रडू नये म्हणून खुद्द आईवडील त्याला मोबाईल देतात व ते चूप बसतं.

मोबाईल पाहण्याची ही आईवडीलांची सवय. तीच सवय बाळांना लागते. आज अगदी लहान बाळ, मग ते एक वर्षाचं का असेना, ते आपल्याला त्रास देतं म्हणून वा त्यानं आपल्याला त्रास देवू नये म्हणून खौद्द आईवडीलच त्याच्या हातात मोबाईल देतात. तो चूप, मग आपलंही काम सुकर. अशी अपेक्षा. परंतु त्यातून आपलं मूल बिघडतं. याचा विचार कोणीच करीत नाही. ही झाली मोबाईलपुराणाची गोष्ट. दुसरी महत्वपुर्ण गोष्ट आहे, आईवडीलांच्या सवयी. त्या सवयीही वाईटच असतात आणि त्याच सवयी बाळांना अगदी ते एकदोन वर्षाचे असतात. तेव्हापासूनच लागत असतात.

मुख्यतः श्रीमंत असो की गरीब असो. आईवडीलांना खर्रा खाण्याची सवय असते. अशावेळेस ते आईवडील स्वतः दुकानात न जाता आपल्या मुलांना पाठवतात. ज्यातून खर्रा खाण्याची सवय मुलांमध्ये लागू शकते. काही घरी वडील हे आपल्याच मुलांसमोर दारु पितात. अशावेळेस मुलांना दारुची सवय लागू शकते. काही स्त्रिया आपली मुलं लहान असतांनाच आपल्या पतीला कामावर जावू देतात व परपुरुषांसोबत व्याभिचार करतात. अशावेळेस मुलांमध्ये व्याभिचाराची सवय लागू शकते. अशी मुलं लहानपणापासूनच त्यांचे आईवडील करीत असलेल्या काही वेगवेगळ्या अनैतिक गोष्टी पाहात असतात. ज्यातून वाईट सवयीचं बीजारोपण होतं. मग मुलं वाईट मार्गावर लागली आणि त्यांनी वाईट कृत्य केलं तर आपल्याला त्याचा पश्चाताप होतो. ही सत्य बाब आहे. परंतु पश्चाताप होण्यापुर्वी जर मुलांची घडणी चांगल्या स्वरुपाची व्हावी असं जर वाटत असेल पालकांना तर त्यांनी त्यांना आपल्या कोणत्याही वाईट सवयी न दाखवता जर चांगल्या गोष्टी सांगीतल्या तर मुलांमध्ये चांगल्या गोष्टी टाकता येतील. चांगल्या मुल्य वा संस्कारांचे त्यांच्यात बीजारोपण करता तरी येवू शकेल. यात आणखी एक उदाहरण. एक व्यक्ती दारु प्राशन करायचा. त्याला रोज सायंकाळी दारु प्यायल्याशिवाय झोपच येत नव्हती. परंतु एक दिवस त्यानं आपल्या तरुण व नुकत्याच वयात आलेल्या मुलाला पाहिलं. त्याला कळलं की दारु वाईट. आपण जशी पितो. तसा मुलगाही प्यायला लागला. ज्यातून मुलाचं भविष्य खराब होणारच. त्यानंतर त्यांना परमात्मा एक. ज्यात दारु अजिबात चालत नाही. हा धर्म घेतला. ज्यातून स्वतः दारु सोडली. ते पाहून मुलालाही नाईलाजास्तव दारु सोडावी लागली. कारण धर्माचं वलय देवून व त्याला संकटाची जोड देवून दारु पिवून घरी आल्यास संकट उद्भवतं. अशी आख्यायिका त्या धर्मात असल्यानं दारुला अजिबात तो मुलगा स्पर्श करीत नव्हता. अशानं त्या मुलात संस्कार वाढीस लागले. दुसरं उदाहरण बाबासाहेबांचं. त्यांचे वडील रामजी सपकाळ कसेही असोत. त्यांनी आपल्या मुलाला घडवीत असतांना चांगली वागणूक ठेवली. ज्यातून डॉ. बाबासाहेब घडले.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आईवडील हेच आपल्या बाळांमध्ये जास्त प्रमाणात संस्कार रुजवू शकतात. जर त्यांनी चांगलं वर्तन घरी ठेवलं तर....कारण आपल्याच वागण्यातून मुलं घडत असतात. आपण कसे वागतो? काय खातो? खाय पितो? हे पाहात असतात मुलं. ते पाहून एखाद्या दिवशी त्याचप्रमाणे करौ पाहतात. ज्यातून संस्कार बिघडतोच. याचाच अर्थ असा की आईवडीलांच्याच विकृत वागण्यातून मुलं बिघडतात. ते जर सुसंस्कारी असतील तर मुलंही सुसंस्कारी निघतात. त्यासाठी आईवडीलांनी खुद्द स्वतःला चांगल्या सवयी लावाव्यात. जेणेकरुन त्यांचंच अनूकरण करौन मुलंही चांगली संस्कारी निघतील. जे संस्कार त्यांच्या पश्चात मुलांच्याच कामात येतील. जसे थॉमस अल्वा एडीसन. त्यांच्या आईनं त्याला शास्त्रज्ञ बनवून दाखवलं. ज्याचं इवलसंही कसब थॉमसच्या आईमध्ये नव्हतं. दुसरं उदाहरण शिवाजी महाराजांचं देता येईल की ज्यांच्या आईनं बाल शिवबाला शिकवलं. ज्यातून स्वराज्याची नीव बांधली गेली. अशी बरीच उद-हरणं आहेत की ज्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या मुलांना घडवलं आहे.

मुखत्वे सांगायचं म्हणजे संस्कार हे मुल्य काही बाजारात मिळत नाहीत. ते घरातच मिळतात, आपल्या आईवडीलांच्या वागण्यातून. आईवडील हेच आपल्या बाळात संस्कार टाकू शकतात. परंतु ते टाकण्यासाठी खुद्द आईवडीलांना आपल्या वाईट सवयीवर बंधन घालावं लागतं. अशी बंधनं जे आईवडील घालू शकतात. त्यांचीच मुलं चांगली सुसंस्कारी बनू शकतात. इतरांची नाही. म्हणूनच खुद्द आईवडीलांनीच संस्कारी राहावे. दारुची सवय असेल तर दारु सोडून द्यावी किंवा मुलांसमोर पिवू नये. व्याभिचाराचक सवय असेल तर तिही गोष्ट सोडून द्यावी. कारण तशा वाईट सवयी या आनुवांशिकतेच्या तत्त्वानुसार गुणसुत्राच्या रुपाने तरी आपल्या येणाऱ्या पिढीत उतरत असतात. म्हणूनच आईवडीलांनी सावधानता बाळगावी. निदान संस्कारासाठी. जर आपली येणारी पिढी चांगली निपजावी, असं वाटत असेल तर...

वशेष म्हणजे आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते व्याभिचार करीत असतील तर...मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आईवडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल. हे तेवढंच खरं.

**–अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# जशी दृष्टी तशी सृष्टी

जीवन जगताना नेहमी काय चुकले...? आणि ते कसे दुरुस्त करता येईल....? याचा विचार होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र कोणाचे चुकले...? आणि ते कसे सिद्ध करता येईल...? याचा प्रयत्न चालू असतो. प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्टीत प्रत्येकजण दुसऱ्याची चूक काढण्यामध्ये जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करतो. दुसऱ्याची चूक शोधूनही काढतो. जमेल त्या पद्धतीने झालेली चूक निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतो. वेळप्रसंगी ती चूक सिद्धही करतो. एवढा सर्व अट्टाहास करून दुसऱ्याला चुकीचा ठरवून दुसऱ्या बाजूला आपण बरोबर असल्याचे कळत नकळत घोषित करून टाकतो. पण प्रत्येकजण एक विचार पूर्णपणे विसरून जातो की, दुसऱ्याला चुकीचे ठरवून आपण बरोबर आहोत हे सिद्ध होत नाही. दुसऱ्याला लहान ठरवून आपण मोठे सुद्धा होऊ शकत नाही. माणूस म्हटले की, चुका होणारच. प्रत्येक माणूस चुकत असतो. फक्त झालेल्या चुकीतून शिकता आले पाहिजे....चूक स्वीकारली पाहिजे आणि झालेली चूक सुधारता आली पाहिजे. म्हणून केवळ चुका काढून बघत नाही तर त्या कशा सुधारता येतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

चुक प्रत्येकाची होते
आहे जन्म माणसाचा
नका शोधू कोणी चूक
शोधा उपाय हो त्याचा...
चुकीतून घेऊ बोध
करू दुरुस्ती नव्याने
पुन्हा नको चूक घडो
आता काळजी मनाने...

आपले संपूर्ण जीवन आपल्या सभोवती फिरत असते. आपल्या जीवनातला सर्वात महत्त्वाचा घटक आपण स्वतः असतो. आपल्यापेक्षा इतर कोणीही महत्त्वाचे नसते. हेच वास्तव आहे आणि हीच वस्तुस्थिती आहे. तरीही हे कोणी मान्य करत नाही. कोणी मान्य करो अगर ना करो... अटीतटीचा, आणीबाणीचा काळ आला की; स्वतः एवढे महत्त्वाचे कुणीच नाही. माणूस स्वतःपेक्षा जास्त कुणावरही प्रेम करत नाही. हे आपोआप सिद्ध होते. असे असले तरी माणस-ाला स्वतःला जगण्यासाठी आणि सुखी, समाधानी, आनंदी राहण्यासाठी सर्वांचीच गरज असते.

जीवनाचा अनुभव संपन्न सार सांगणारे आजी-आजोबा हवे असतात. जन्मदाते आई-वडील हवे असतात. प्रत्येकाला भाऊ-बहीण, मित्र-सवंगडी हेही आवश्यक असतात. आयुष्याला प्रत्येक सुख-दु:खाच्या प्रसंगाला साथ-सोबत करणारा जीवनस-ाथी-जोडीदार हवा असतो. मुलगा-मुलगी, लेकरं-बाळं हवे असतात. असे बहरलेल्या गोकुळासारखे संपूर्ण परिपूर्ण कुटुंब हवे असते. या कुटुंबाच्या अनुषंगाने काका-काकू, मामा-मामी, आत्या, मावशी यासारखे जीवाभावाचे सर्व नातेवाईक पाहिजे असतात. कुटुंबात, नात्यात, नातेवाईकात, आप्तस्वकीयात आणि मित्रपरिवारात सामंजस्य, एकमेकांना आधार देण्याची क्षमता, भावनिक ऊर्जा देण्याची ताकद, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा आपुलकी असणे महत्त्वाचे असते. तरच या सगळ्या नात्यांना अर्थ असतो. तर या सगळ्यांपासून आपल्याला आधार मिळतो. मानसिक बळ मिळते. कुटुंबाचा, नात्याचा माणसाला आधार वाटला पाहिजे. घरी आल्यानंतर तुम्हाला मन:शांती मिळावी. बाह्य जगातले सगळे ताण-तणाव आणि प्रश्न कितीही मोठे असले तरी ही माणसे माझी ऊर्जा स्थान आहेत यांच्यासाठी मला लढायचे आहे असे वाटले पाहिजे. समजा असे होत नसेल तर मात्र कुटुंबाच्या समस्या सुटता सुटत नाहीत. नात्यांचा गुंता वाढत जातो. कुटुंबात, नात्यात आक्रमकतेने प्रश्न सुटत नाहीत तर ते सामंजस्याने सुटतात. म्हणून इथे सामंजस्याची चढाओढ हवी. इथे स्वार्थाचा उपयोग नाही तर त्याग, समर्पणाची स्पर्धा असायला हवी.

प्रेम, जिव्हाळा, ममता
कुठे सहज मिळते
कष्टोनिया, झिजूनिया
माया लावावी लागते...
करा त्याग, समर्पण
स्वार्थ सोडावा लागतो
सामंजस्य ठेवा मनी
अर्थ नात्याचा कळतो...
करा आदर सर्वांचा
ठेवा नम्रता शब्दांत
खूप महत्त्वाचे सारे
माणसाच्या जीवनात...

खरेतर प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया, मम ता, वात्सल्य या भावना सहज निर्माण होत नाहीत. त्या आपल्या वागण्या-बोलण्यातून निर्माण कराव्या लागतात. सुरुवात आपल्या स्वतःला करावी लागते. आपण सर्वां सोबत चांगले वागावे लागते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा प्रथमतः आपण आपल्या वागण्या-बोलण्यात प्रामाणिकपणे उतरवायचा असतो. तसे वागायचे असते.

एकमेकांविषयांचा आदर, एकमेकांची कदर करणे फार गरजेचे असते. आपण माया लावली तरच दुसरे लोक आपल्याला प्रेम, माया, आपुलकी आणि जिव्हाळा लावत असतात. तुमच्या स्वतःच्या वागण्यात, बोलण्यात जे असेल तेच समोरून आपल्याला मिळत असते. तुम्ही कसे आहात यावरून इतर लोक तुमच्या सोबत कसे वागतील हे ठरत असते. म्हणूनच म्हणतात...जशी दृष्टी तशी सृष्टी.

तुमची दुसऱ्यांना समजून घेण्याची वृत्ती असेल तर तुम्हाला मला समजून घ्या... म्हणण्याची आवश्यकता नाही. लोक तुम्हाला समजून घेता-तच. दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे आणि त्याच्या भूमिकेत शिरून ऐकून घेण्याची प्रवृत्ती तुमच्या अंगी असेल तर लोक तुम्हाला नेहमी आपुलकीने बोलतात. आपले दुःख, वेदना, आणि संवेदना सांगत असतात. तुमचा ऐकून घेण्याचा सुद्धा त्यांना आधार वाटत असतो. ज्यावेळी तुम्ही दुसऱ्याचे दुःख समजून घेता. त्यावेळी समोरची व्यक्तीही तुमचे सुख-दुःख आणि वेदना समजून घेत असते. प्रत्येक वेळी प्रत्येक विषयावर आपण बोललेच पाहिजे किंवा आपले मत मांडलेच पाहिजे असे नसते. बराच वेळा दुसऱ्याचे मत समजून घेणे, दुसऱ्याच्या भावना समजून घेणे हेही फार महत्त्वाचे असते. प्रत्येक गोष्ट चूक किंवा बरोबर ठरवता येत नसते. प्रत्येक माणसाची धारणा आणि दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येकाची मते वेगवेगळी असतात. कोणत्याही प्रसंगावरून किंवा घडलेल्या घटनेवरून प्रत्येकाला वेगवेगळ्या भावना वाटू शकतात. प्रत्येकाने आपल्याच दृष्टीने बघावे हा अट्टाहास निरर्थक आहे. प्रत्येक बाबी, प्रसंग आणि गोष्टी सुद्धा व्यक्तिनिष्ठ असतात.

नका सांगू आपलेच
घ्यावे ऐकून सर्वांचे
सुख-दुःख प्रत्येकाला
मोल तेच वेदनेचे...

नेहमी आपल्या माणसांना भेटा, त्यांचे ऐकून घ्या. त्यांना समजून घ्या. तुम्हीही भरभरून बोला. एकमेकांशी सुसंवाद ठेवा. संवादातून गैरसमज करून घेऊ नका. एखाद्याचे आपल्याबद्दल बोलणे चुकले असेल तर त्याला संयमाने, शांतपणे तशी जाणीव करून द्या. समोरची व्यक्ती त्याची चूक नक्की सुधारेल फक्त प्रेमाने सांगून बघा. प्रत्येक बोलण्याचे-वागण्याचे संदर्भ वेगवेगळे असतात. प्रत्येक गोष्टीचा आपल्या परीने अर्थ काढून गैरसमज करून घेऊ नका. दुसऱ्याला नेमके काय सांगायचे आहे...? आपल्या कृतीतून काय सिद्ध करायचे आहे...? हे पूर्णपणे समजून घ्या. वरवर चुकीचा किंवा आपल्या सोयीचा अंदाज काढू नका.

घ्यावे समजून खरे
नको अंदाज उपरा
ऐक थोडे बोल काही
रिक्त मनाचा कोपरा...

प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा, सुख, समाधान, आनंद, दुःख, भीती, राग या मानवी मनाच्या सगळ्याच भावना बहुआयामी आहेत. या सर्व भावनांचे वेगवेगळ्या प्रसंगातील स्थान समजून घ्या. प्रसंगानुरूप आवश्यक आणि योग्य भावना प्रकट झाली पाहिजे. मुळात कोणतीच भावना वाईट नसते प्रसंगाशी, गोष्टीशी विसंगत भावना चुकीची ठरते. म्हणून प्रसंग आणि गोष्टी बारकाईने समजून घ्या. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रेम ही भावना विविध अंगी, व्यक्ती व नात्यापरत्वे वेगवेगळी आहे. प्रेमासारख्या व्यापक भावनेला बंदिस्त करू नका. प्रेमाचा एकाच अर्थाने विचार करू नका.

बऱ्याचशा गोष्टी गैरसमजातून उद्भवतात. म्हणून जीवन चांगल्या प्रकारे समजून घ्या. कधीच आणि कोणत्याच बाबतीत गैरसमज करू नका. छान, मोकळे, स्वच्छ आणि स्वच्छंदी जीवन जगा. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही. स्वतः आनंदात जगा आणि दुसऱ्यालाही आनंदात जगू द्या. छोट्या-छोट्या गोष्टीत अडकून पडू नका. हे जग फार विशाल आहे. जसे आपले अस्तित्व आणि व्यक्तिमत्व महत्त्वाचे आहे; तसे प्रत्येक माणसाचे अस्तित्व आणि व्यक्तिमत्व तेवढेच महत्त्वाचे आहे. एकमेकांच्या अस्तित्वाची,व्यक्तिम त्वाची,भावनांची, सुख-दुःखांची, कर्तुत्वाची कदर करायला शिका प्रत्येकाविषयी आदर बाळगा. एकमेकांविषयी सहानुभूती ठेवा. एकमेकांचा आधार बना.

नको होऊ खूप मोठा
नको जोडू फार धन
रंजल्यांचा गांजल्यांचा
खरा तू आधार बन....

या व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टीने जीवनाकडे बघा. फक्त लोकांच्याच चुका काढू नका. आपल्याही चुका शोधा आणि त्या सुधारा. म्हणून म्हणतोय विचार करताना...आपण चुकत आहोत का...?

**–मयूर जोशी,**
जिंतूर, जि. परभणी
मो. ७९७२३४४१२८

# राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन



आज ११ मे आजचा दिवस आपल्या देशात राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९९९ सालापासून दरवर्षी तंत्रदान विकास महामंडळ ( टी डी बी ) यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. ११ मे १९९८ रोजी भारताने एरोस्पेस अभियंता आणि डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या मार्गदशनाखाली राजस्थान येथील पोखरणच्या वाळवंटात शक्ती या अण्वस्त्रांच्या चाचण्या दोन टप्प्यात यशस्वी केल्या.

दोन दिवसांनी म्हणजे १३ मे रोजी पुन्हा पोखरण २ ऑपरेशन शक्ती अंतर्गत आणखी दोन अण्वस्त्र चाचण्या केल्या. अण्वस्त्रांच्या या सर्व चाचण्या यशस्वी करून भारत अण्वस्त्र संपन्न राष्ट्र बनले. तेंव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत अण्वस्त्र सज्ज झाल्याचे जाहीर केले आणि करोडो भारतीयांची मान अभिमानाने उंचावली. भारताने केलेली ही दुसरी अणूचाचणी होती.

१९७४ साली भारताने पहिल्यांदा अणवस्त्रांची चाचणी केली त्यावेळी इंदिरा गांधी या पंतप्रधान होत्या. त्याच्या यशस्वितेचा संकेतांक (कोडवर्ड) होता द बुद्धा लाफड - बुद्ध हसला.... ११ मे १९९८ रोजी दुसऱ्या यशस्वी चाचणीचा संकेतांक होता, द बुद्धा लाफड आगेन - बुद्ध पुन्हा हसला... २४ वर्षांनंतर भारताने जमिनी-खालून प्रत्यक्ष अणुस्फोट घडवून आणून ते यशस्वी केले तेंव्हा जगातील साऱ्या देशाने तोंडात बोटे घातले मित्र राष्ट्राने कौतुक केले तर शत्रू राष्ट्राचा जळफळाट झाला. ही अणू-चाचणी करताना भारताने कमालीची गुप्तता पाळली होती. अमेरिकेलाही या अणू-चाचणीचा सुगावा लागला नव्हता. या अणू चाचण्यांमुळे भारत जगातील सहावे अण्वस्त्र सज्ज राष्ट्र बनले. याच काळात भारताने विकसित केलले स्वदेशी बनावटीचे पहिले विमान हंस - ३ ने त्याचे पहिले उड्डाण बंगळुरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचेच्या (सीएसआयआर) विमान नॅशनल एरोस्पेस लॅबरोटरीज (एनएएल) ने विकसित केले होते.

तसेच ११ मे १९९८ रोजीच संरक्षण संशोधन विकास संघटना ( डीआरडीओ) त्रिशूल क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. कमी पल्ल्याचे पण जमिनीवरून हवेत जलद मारा करणारे त्रिशूल हे भारताच्या एकात्मिक गायडेड क्षेप-णास्त्र कार्यक्रमाचा एक भाग होता. ११ मे च्या अणूचाचणी नंतर भारताने तंत्रदान क्षेत्रात हे प्रचंड यश मिळवले होते म्हणूनच त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन म्हणून घोषित केला.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन निवडणुकीत वाद

**▸ निवडणूक प्रक्रियेत हितसंबंधांचा संघर्ष ? ▸ नातेवाईकांना उमेदवारी व अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर आरोप**

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आगामी निवडणुकीपूर्वीच मोठा वाद उफाळून आला असून, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. असोसिएशनचे सदस्य तथा फार्मासिस्ट विजय वाघमोडे यांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करत निवडणूक प्रक्रियेत हितसंबंधांचा संघर्ष होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

तक्रारीनुसार ज्या संघटनेची निवडणूक होत आहे त्याच संघटनेतील सदस्यांना निवडणूक



अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आल्याने निष्पक्षतेवर संशय निर्माण झाला आहे. स्वतःच खेळाडू आणि स्वतःच पंच अशी परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे.

याशिवाय काही निवडणूक अधिकारी उमेदवारांचे जवळचे नातेवाईक असल्याने गोपनीय माहिती फुटण्याची व विशिष्ट उमेदवारांना फायदा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता धोक्यात आल्याचे म्हटले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, निवडणूक प्रक्रियेबाबत दिलेल्या निवेदनाची साधी पोचपावती देण्यासही स्थानिक अधिकाऱ्यांनी नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. लोकशाही प्रक्रियेत तक्रार स्वीकारण्यास नकार देणे ही गंभीर बाब असल्याची चर्चा आता सदस्यांमध्ये सुरू झाली आहे.

निवडणूक कोणत्याही दबावाशिवाय, कोणाच्याही बाजूने न झुकता आणि पूर्ण पारदर्शकतेने पार पडली पाहिजे; अन्यथा सदस्यांचा विश्वास उडेल, असा इशाराही तक्रारदाराने दिला आहे. या प्रकरणामुळे 'एनडीसीडी'च्या निवडणुकीभोवती संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, आता मुख्य निवडणूक अधिकारी यावर काय भूमिका घेतात याकडे सर्व सदस्यांचे लक्ष लागले आहे.

# पोकरा योजनेतून रेशीम शेतीचा शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी) –** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत परवडणारी व शाश्वत उत्पन्न देणारी रेशीम शेती कशी करावी, याविषयी मार्गदर्शन शिबीर लोहा तालुक्यातील मौजे लोंढेसांगवी येथे पार पडले.

शिबिरात जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना रेशीम (कोशल्याची शेती) रोपे लागवड, संगोपन आणि व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, सध्याच्या काळात पारंपरिक पिकांना लागणारा खर्च वाढला आहे. पाऊस कमी–जास्त झाल्यास पिकाचे मोठे नुकसान होते. उत्पन्नाची कोणतीही हमी नसते. अशा नुकसानीतून वाचण्यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला जोडून रेशीमसारख्या नवीन पद्धतीची शेती स्वीकारावी. रेशीम शेतीत दरवर्षी लागवडीचा खर्च वाचतो, फवारणीचा खर्च कमी होतो आणि उत्पन्नाची हमी मिळते, असे त्यांनी सांगितले.

शासनाकडून पोकरा योजनेतून १ एकर रेशीम शेतीसाठी ३ ते ४ लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी सहायक कृषी अधिकारी मनोहर वडवळे यांनी आवाहन केले.

# दाताळा येथील जि. प. प्रा. शाळेच्या शिक्षकांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी) –**कंधार तालुक्यातील दाताळा येथील जि. प. प्रा. शाळा 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर'. शाळा' टप्पा क्र. ३ या स्पर्धेत तालुक्यात प्रथम आल्याबद्दल शाळेच्या माजी विद्यार्थी संघा-तर्फे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. छाया बोनगुलवार, शिक्षिका येनुरे व कोनाळे मॅडम तसेच शिक्षक माकणे, बनसोडे, टोपे व धुळशेट्टे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. बी. डी. गचांडे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महात्मा गांधी, शिवाजी म हाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील प्रत्येक वर्गातून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघातर्फे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रोत्हाहनपर बक्षीस देण्यात आले. तसेच प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी शाळेतील ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती जास्त आहे अशा प्रत्येक वर्गातील दोन विद्यार्थ्यांना अनुक्रमे बक्षीस देण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. गचांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या ग्रंथालयासाठी ५ हजार रुपयांची पुस्तके खरेदी करुन देण्याचे जाहीर केले. सूत्रसंचालन संघाचे अध्यक्ष जीवनराव पाटील शिंदे यांनी केले. तर अभार ग्रंथपाल शंकर मिरकुटे यांनी मानले.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते दिलीप सिरसाट, शालेय समितीचे अध्यक्ष, सदस्य, विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सिग्मा प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे द्वितीय पारितोषिक राजयोग चालेंजर्सने पटकावले

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –येथील राजयोग चालेंजर्स या संघाने संघमालक अविनाश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली द्वितीय पारितोषिक प्राप्त केले आहे. या पारितोषिकाचे स्वरूप एकतीस हजार रुपये, ट्रॉफी असे होते.

सिग्मा प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत १६ क्रिकेट संघाने आपल्या टिम उतरवल्या होत्या. अंतिम सामना हमास क्रिकेट टीम व राजयोग चॅलेंजर्स यांच्यात होऊन अंतिम सामना हमास टीमने जिंकला. दुसरे बक्षीस राजयोग चालेंजर्स क्रिकेट टीमने जिंकत ३१ हजार रुपये व ट्रॉफी संघमालक अविनाश काळे, कर्णधार बालाजी धिरबसी यांच्याकडे संयोजकांनी सुपूर्द करताच राजयोग चॅलेंजर्सच्या क्रिकेटपटू रवी पाटील बेराडे, सोमेश कानोडे, सुरज देशमुख, देवानंद शेट्टे, शुभम संगनवार, सौरभ पाटील, अर्जुन बोचारे, अनिल जाधव, बालाजी सोळंके, जाबेर शेख, राहुल वाडगुरे, वसीम शेख, गणेश मोहिते यांनी जल्लोष केला.

यावेळी राजयोग चॅलेंजर्स क्रिकेट संघाचे मालक अविनाश काळे म्हणाले की, प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करून ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाला वाव मिळावा व ग्रामीण भागातील खेळाडू राज्यस्तरीय क्रिकेट-मध्ये खेळण्याची संधी मिळावी यासाठी प्रिमियरलिग स्पर्धेचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे.




# किनवटमध्ये महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी



**किनवट (प्रतिनिधी) –** शहरातील महाराणा प्रताप चौक येथे शनिवार, दि. ९ रोजी वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी आमदार भीमराव केराम, नगराध्यक्षा सुजाता एंड्रूलवार, पोलीस निरीक्षक गणेश कराड, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शिवसेना शहरप्रमुख तथा नगरसेवक सुरज सातुरवार, शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, भावना दीक्षित, संगीता मंडारे यांच्यासह सम ाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले.

# नांदेड जिल्ह्यातील शाळा व विद्यार्थ्यांचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

**नांदेड (प्रतिनिधी) –** इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत नांदेड जिल्ह्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या निकालामुळे जिल्ह्यातील शाळांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख दिसून आला.

### ज्ञानेश्वरी प्रायमरी, सेकंडरी ईंग्लिश स्कूल



**नांदेड –** येथील ज्ञानेश्वरी प्रायमरी, सेकेंडरी ईंग्लिश स्कूलने फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या १००% निकालाची व यशाची परंपरा कायम ठेवली आहे. सलग ७ व्या वर्षी शाळेचा दहावीचा निकाल १००% लागला आहे. या शाळेचे चार विद्यार्थी ज्ञानेश्वरीतून तसेच श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल कापसी (गुंफा) या केंन्द्रातून कु. सम्राज्ञी सुनिल दर्शने प्रथम ९१ टक्के, अनिरूद्ध सोपान ढेपे द्वितीय ८९.६० टक्के तर तृतीय येण्याचा मान कु. किशोरी काळेश्वर घोगरे व कु. सुहाणी शिवराज ढगे यांनी ८८.४० टक्के गुण घेऊन गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांचे शाळेचे प्राचार्य संजय पाटील ढेपे व शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले आहे.

ज्ञानेश्वरी ईंग्लिश स्कूल या शाळेतून शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ साठी एकूण २१ विद्यार्थी बसले होते. ते सर्वच्या सर्व चांगल्या गुणांनी पास झाल्यामुळे शाळेचा निकाल सलग ७ व्या वर्षीही १०० टक्के लागला आहे. शाळेच्या शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे. ज्ञानेश्वरीतून व तसेच श्री संत बाळगीर महाराज हायस्कूल कापसी (गुंफा) या केंन्द्रातून कु. सम्राज्ञी सुनिल दर्शने प्रथम ९१ टक्के, अनिरूद्ध सोपान ढेपे द्वितीय ८९.६० टक्के तर तृतीय येण्याचा मान कु. किशोरी काळेश्वर घोगरे व कु. सुहाणी शिवराज ढगे यांनी ८८.४० टक्के गुण घेऊन यश संपादन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे प्राचार्य संजय पाटील ढेपे शाळेच्या सहशिक्षिका कान्होपात्रा तिरमाले, प्रियदर्शिनी सामला, नेहा तरटे, आरती खानसोळे, स्वाती कपाळे, चांगुणा भरकडे, सीमा जोंधळे, प्रियंका लामतलवारे यांच्यासह पुरूषोत्तम जोशी, गंगाधर ढेपे, वैष्णव ढेपे, सुनिल तारू व आनंद जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

### जिल्हा परिषद हायस्कूल मरळक

**नांदेड**–तालुक्यातील मरकळ (बु) येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावी बोर्ड परीक्षेत पहिल्याच वर्षी घवघवीत यश संपादन केले असून, या शाळेचा निकाल ९५ टक्के लागला आहे.

अंजली शंकर नरवाडे हिने ९२.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर कृष्णा दाळपुसे ८६.४० टक्के, दिव्या शवंतवाड ८५.८० टक्के, प्रतीक आव्हाड ८४.४० टक्के, त्रिमुख कदम ८४.४० टक्के, राजश्री शिंदे ८०.८० टक्के आदी विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले आहे. शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक माधव कांबळे, शिक्षक वाडकर, कावलगावकर, सुशील गिरी, नायटे, राहुल कदम, शिवाजी कदम, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष शिवदास कदम, गट शिक्षण अधिकारी सुधीर गुट्टे, सौ.लता कौठैकर, कामाजी डांगे आदींनी अभिनंदन केले आहे.

### महात्मा ज्योतीबा फुले माध्यमिक विद्यालय

**किनवट** –महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या दहावी परीक्षेत मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ अंबाडी द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय गोकुंदा ता. किनवटने या वर्षीही आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक आलेख उंचावत ठेवला आहे.

विद्यालयाच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सेमी इंग्रजी माध्यमातून एकूण ३२० विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होते. त्यापैकी ३१३ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले. सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल ९८ टक्के लागला असून यामध्ये प्रथम श्रेणीत ६० टक्क्यांपेक्षा जास्त, ८९ विद्यार्थी विशेष प्रावीण्य (७५ टक्क्यांपेक्षा जास्त), ९७ विद्यार्थी (९० टक्क्यांपेक्षा जास्त) तर २६ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता प्राप्त केली आहे. यामध्ये गुणाणुक्रमे आलेले विद्यार्थी असे : कु. केतकी गजानन डवरे (९८.४० टक्के) प्रथम, कु. श्रुती नरेंद्र कोगुरवार (९७ टक्के) द्वितीय तर कु. प्रेरणा नगसेन तामगाडगे (९६ टक्के) हिने तृतीय क्रमांक पटकावला. मराठी माध्यमात एकूण १५७ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट होते. त्यापैकी १२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मराठी माध्यमाचा एकूण निकाल ८२ टक्के इतका लागला असून शाळेचा एकूण निकाल ९२.४५ टक्के लागला आहे.

मराठी माध्यमामध्ये प्रथम श्रेणीत (६० टक्क्यांपेक्षा जास्त) ३६ विद्यार्थी, विशेष प्रावीण्य (७५ टक्क्यांपेक्षा जास्त) ८ विद्यार्थी तर (८० टक्क्यांपेक्षा जास्त) ४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. मराठी म ाध्यमात सर्वाधिक गुण घेऊन गुणानुक्रमे आलेले विद्यार्थी असे : अभय मुनेश जाधव (८२.४० टक्के) प्रथम, गोपाल दिलीप चव्हाण (८२ टक्के) द्वितीय तर ओमकार अतुल येलेबोईनवाड (८०.८० टक्के) गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला.

सेमी इंग्रजी माध्यमातून गणित विषयांमध्ये १०० पैकी १०० गुणांसह कु. प्रेरणा नागसेन तामगाडगे या विद्यार्थिनीने देदीप्यमान यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव अभि. प्रशांत ठमके, कोषाध्यक्षा शुभांगी ठमके, मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रमोद मुनेश्वर, उपप्राचार्य श्याम जाधव, उपमुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक प्रा. संतोष बैसठाकूर, प्रा. रघुनाथ इंगळे, मनोज भोयर, मुकुंद मुनेश्वर आणि सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूल, देगलूर

**देगलूर** –देगलूर शहरातील ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देगलूर या शाळेने यशाची परंपरा कायम राखत गेल्या १४ वर्षापासून १०० टक्के निकाल प्राप्त केला आहे.

देगलूर येथील या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील संके आदर्श मिलिंद याने ९८.५० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे व या शाळेतील परबते गणेश भास्कर याने ९२.४० टक्के गुण मिळवून शाळेत द्वितीय आला आहे तर कुमारी श्रद्धा शंकर शिंदे व यश धम्मपाल कांबळे या दोघांनी ९२.२० टक्के गुण घेऊन शाळेत तृतीय आले आहेत.

एकूण ३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यातील २० मुले-मुली विशेष प्राविण्यासह व १४ मुले-मुली प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे सचिव माणिकराव जोशी यांनी केला असून, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### एसव्हीएम हायस्कूल किनवट



**किनवट –** उच्च माध्यमिक परीक्षेपाठोपाठ शालांत परीक्षेच्या निकालातही येथील सरस्वती विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने आपल्या उज्वल यशाचा वारसा यंदाही कायम राखला आहे. या शाळेचा सेमी इंग्रजी माध्यमाचा १०० टक्के निकाल लागला असून, शाळेचा एकूण निकाल ८८.४२ टक्के लागला आहे.

या यशात विद्यालयाची विद्यार्थिनी कु. इशिता डॉ. वंदना शिरीष पत्की हिने १०० टक्के गुण मिळवून बोर्डातून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या यशामुळे तिचे कौतुक होत आहे. शाळेचा सेमी इंग्रजीचा निकाल १०० टक्के लागला आहे. सेमी इंग्रजी व मराठी माध्यमातून एकूण २१६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी १९१ विद्यार्थी पास झाले. ११ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण घेवून विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. २८ विद्यार्थी ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह ४४ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विशेष प्राविण्यात उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे गुण असे : इशिता शिरीष पत्की -१०० टक्के, वंशिका रामकृष्ण केंद्रे - ९७.४० टक्के, कल्याणी ज्ञानेश्वर कदम - ९६ टक्के, अजय विजय सर्पे -९५ टक्के, श्रेया विशाल कोंडे -९४.६० टक्के, ऋचा रमाकांत चक्करवार - ९३.४० टक्के, आयुष राजन बोतावार -९३.२० टक्के, गौरी घनशाम कुऱ्हाडे - ९२.२० टक्के, रुद्राणी ज्ञानेश्वर परकले -९१.२० टक्के, आरती राजू बेहरे - ९०.८० टक्के, तर अश्विनी रवी गीनगुले हिने ६० टक्के गुण प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, संस्थेचे सचिव तथा मुख्याधापक कृष्णकुमार नेम्मानीवार यांनी कौतुक केले.

### राजर्षी शाहू विद्यालय नांदेड

**नांदेड** –राजर्षी शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वसंतनगर, नांदेडचा नुकताच बारावी व दहावी बोर्डाचा निकाल जाहीर झाला. शाळेचा दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल हा ९८.२४% लागला असून शाळेने निकालाची परंपरा कायम राखली आहे. दहावी बोर्ड परीक्षेत २२४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तब्बल १०२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत आणि ७० विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

निकालाची विशेष परंपरा म्हणजे राजर्षी शाहू विद्यालयाची सुवर्णकन्या समृद्धी विलास पवार या विद्यार्थिनीने १०० टक्के गुण प्राप्त करून शाळेतून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे यांनी तिचा शाल, पुष्पगुच्छ व पेढा भरवून तिच्या पालकासह सत्कार केला. वरद पांचाळ या विद्यार्थ्याने ९७.२० टक्के गुण प्राप्त केले आहेत. दहावी बोर्ड परीक्षेत ९० टक्केपेक्षा जास्त गुण घेणारे अनेक विद्यार्थी आहेत.

तसेच राजर्षी शाहू ज्युनिअर कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल ७७ टक्के लागला असून, ३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. कु. रेणुका जाधव या विद्यार्थिनीने ८७.३३ टक्के गुण घेऊन कॉलेजमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष बाब म्हणजे तिने अर्थशास्त्रासारख्या विषयात ९८ गुण प्राप्त केले आहेत. तिला शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे, डॉ. तुकाराम जाधव, प्रमोद सावंत, श्रीमती हंबर्डे, श्रीमती इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापकांनी दहावीला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांचे आभार मानले व यशाचे श्रेय शिक्षकांना दिले. शाळेच्या या उत्तुंग यशाबद्दल मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोपाळराव कदम, सचिव चंद्रशेखर सोनवणे, कोषाध्यक्ष नरसिंगराव पावडे, संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### मॉडर्न इंग्लिश स्कूल उमरी

**उमरी** –शालांत प्रमाणपत्र परीक्षेत मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने सलग तिसऱ्या वर्षी आपली शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखण्यात यश मिळविले आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून तालुक्यात पहिला येण्याचा बहुमान मॉडर्नच्या तम्मेवार शर्वरी गजानन आणि यम्मेवार वैभवी प्रवीण यांना मिळाला आहे. त्यांनी ९५ टक्के गुण प्राप्त केले आहेत. तसेच मराठी व इंग्रजी माध्यमातून त्या दोघी तालुक्यातून सर्वद्वितीय आलेल्या आहेत.

विज्ञान विषयात तम्मेवार शर्वरी गजानन हिला १०० पैकी १०० गुण मिळाले असून, गणित विषयात शर्वरी आणि वैभवीला १०० पैकी ९८ गुण प्राप्त झाले आहेत.

शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी मॉडर्नचे १५ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १२ विद्यार्थ्यांना ८० टक्केपेक्षा अधिक गुण मिळाले असून, २ विद्यार्थी ७० टक्केपेक्षा अधिकचे व एका विद्यार्थ्यांस ६९.२० टक्के गुण मिळाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. अनुराधा कुलकर्णी, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सायली अपसिंगेकर, संचालिका सौ. सानिका सराफ, सर्व संचालक मंडळ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले असून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### श्रावणी बनबरे हिचे दहावी परीक्षेत यश



**नांदेड** –आंतर भारती माध्यमिक विद्यालय बिलोली येथील विद्यार्थिनी कु. श्रावणी भाऊसाहेब बनबरे हिने दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९५. ६० टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे.

श्रावणी हिने हे यश मिळवून शाळेतून सर्वप्रथम तर बिलोली तालुक्यातून द्वितीय येण्याचा मान पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांसह माजी आ. सुभाषराव साबणे, जि. प. सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड, खरेदी विक्री संघाचे चेअरमन अरविंद ठक्करवाड, राजेंद्र रेड्डी तोटावाड, मारोती राहिरे, प्रा. शंकर पवार, सरपंच अशोक दगडे, मुख्याध्यापक विठ्ठल चंदनकर, सुभाष पवार, नागनाथ चव्हाण, अमरदीप दगडे, राजेंद्र रुद्रूरकर, तुकाराम शिंदे, राम पवार, संजय पवार, बालाजी पसरगे आदींनी अभिनंदन केले आहे.

### रिया देशमुख हिचे दहावी परीक्षेत यश



**नांदेड** –रिया पद्माकर देशमुख हिने दहावी परीक्षेत ९९.२० टक्के गुण मिळवून यश प्राप्त केले आहे. रिया ही नांदेडच्या गुजराती हायस्कूलची विद्यार्थिनी आहे. रियाला भविष्यात इंडियन एअरफोर्समध्ये अभियंता व्हायचे आहे. रियाचे वडील पद्माकर देशमुख एमजीएम अभियांत्रिकी म हाविद्यालयात संगणकशास्त्र विभागात प्रोग्रॅमर म्हणून काम करतात. तिच्या या यशाबद्दल ती आपल्या यशाचे श्रेय आईवडिलांना आणि सर्व गुरुजनांना देते. रियाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### श्रद्धा बाऱ्हाळीकर हिचे यश



**नांदेड** –शहरातील पासदगाव येथील होलिसिटी पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी श्रद्धा दीपक बाऱ्हाळीकर हिने दहावीच्या परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम आली आहे. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. लहानपणापासूनच अभ्यासू, मेहनती आणि जिज्ञासू स्वभावाची असलेली श्रद्धा पहिलीपासूनच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करीत होती. दहावीच्या निकालातही तिने उत्कृष्ट यश संपादन करीत शाळेचा गौरव वाढविला आहे.

# प्रगतीमंत्र

## घरबसल्या कसला नफा?

### भामट्यांची गुन्हे पद्धत नेमकी कशी?



**टास्क, लाइक, सबस्क्राइब आणि पार्टटाइम नोकरीचे प्रलोभन दाखवून फसवणुकीचे गुन्हे प्रचंड वाढले आहेत. पोलिसांनी वारंवार सतर्क करूनही सर्वसामान्य नागरिक त्यांना असलेल्या अज्ञानामुळे सायबर चोरांच्या जाळ्यात अडकत आहेत. ही गुन्हे पद्धत नेमकी कशी वापरली जाते, आपण कोणती सावधगिरी बाळगावी आणि फसवणूक झाल्यास काय करावे ? अनेकांनी नवीन नोकरी शोधण्यासाठी लिंक्डइन, नोकरी डॉट कॉमसारख्या वेबसाइटसवर नोंदणी केलेली असते. त्यातील डेटाचा वापर करून मोबाइल क्रमांकावर पार्टटाइम नोकरीचे संदेश पाठविले जातात. संदेशातील लिंकवर क्लिक करताच व्हॉटसअ‍ॅप किंवा समाजमाध्यमावरील अकाऊंट सुरू होते. व्हॉटस्‌ ॲप किंवा टेलिग्रामच्या ग्रुपवर सदस्य असलेले अनेकजण घरबसल्या रोज अधिक नफा कमावता येईल हे पटवून देतात.**

#### अशाप्रकारे विश्वास कमावतात

व्हॉटसअ‍ॅप किंवा टेलिग्रामच्या ग्रुपचा ॲडमिन अमूक एका कंपनीत पार्टटाइम नोकरी असल्याचे सांगतो. संबंधित कंपनी टूर्स अँड ट्रॅव्हल्स किंवा वर्ल्ड टुरिझम किंवा रेटिंग क्षेत्रातील असल्याचे भासविले जाते. युट्युबवरील काही व्हिडीओ, गुगलवरील पर्यटन स्थळ पाहून ती लाइक करण्याचे काम दिले जाते. लाइक केलेले स्क्रीनशॉट ग्रुपवर पाठवायला सांगतात. एका लाइकचे कमीत कमी ५० रुपये दिले जातात. सुरुवातीला काही रक्कम बँक खात्यामध्ये जमा करून विश्वास संपादन करतात.

#### आधी कमाई नंतर गुंतवणूक

बँक खात्यावर पैसे आल्यानंतर एखादी लिंक किंवा प्ले स्टोअरवरून एखादे ॲप डाउनलोड करण्यास सांगतात. यावरून नोंदणी केल्यानंतर वॉलेट अकाउंट तयार होते. टास्क जिंकून कमावलेली रक्कम या वॉलेटमध्ये जमा होते. नियमित रक्कम येत असल्याने गुंतवणुकीस सांगितले जाते. गुंतवलेल्या रकमेवर नफा देखील वॉलेटमध्ये दिसतो. क्रिप्टो करन्सी किंवा इतर आभासी चलनात गुंतवणूक करण्यास सांगितली जाते. नफा दिसत असल्याने संबंधित व्यक्ती आणखी गुंतवणूक करते



#### इथे लक्षात येते फसवणूक

वॉलेटमध्ये नफा जमा होत असल्याने गुंतवणुकीची रक्कम वाढवली जाते. क्षमता संपली की पैसे बँक खात्यात वळविण्याचा प्रयत्न आपण करतो. वॉलेटमधील पैसे प्रत्यक्षात मिळत नाही. ग्रुप ॲडमीन किंवा कंपनीचा प्रतिनिधी संपर्क तोडतो.

#### हे लक्षात असू द्या

- घरबसल्या हजारो, लाखोंचे उत्पन्न कुणी देणे शक्य नाही
- अनोळखी क्रमांकावरील संदेशला प्रतिसाद देऊ नका
- संदेशातील लिंकवर क्लिक किंवा क्रमांकावर संपर्क साधू नका
- समाजमाध्यमांवरील आकर्षक जाहिरातींना भुलू नका
- ॲनी डेस्क, क्विक सपोर्ट, टीम व्ह्यूअर ॲप डाउनलोड करू नये
- कोणत्याही लिंकवर, ग्रुपमध्ये बँक खात्याचा तपशील देऊ नका
- फसवणूक झाल्यास १९३० या हेल्पलाइनवर संपर्क करा
- जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर पोलिसांकडे तक्रार करा

## इंटर्नशिप टिप्स...


### व्यावसायिक जीवनातील प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टी शिकण्याची संधी; स्वारस्स असणे गरजेचे

**प्रत्येकाला आपल्या करिअरच्या सुरुवातीला कुठे ना कुठे इंटर्नशिप ही करावीच लागते. या अनुभवातूनच पुढे जाऊन तुम्हाला नोकरीच्या संधी निर्माण होतात. इंटर्नशिप मिळाली की त्याच कंपनीत पूर्णवेळ नोकरी मिळते असे अनेक उमेदवारांना वाटते. पण असे प्रत्येकवेळी शक्य होते असे नाही. याची वेगवेगळी कारणे असू शकतात. आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टी सांगणार आहोत. या टिप्स फॉलो करून तुम्ही तुमची इच्छा पूर्ण करू शकता. फक्त यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. याबद्दल जाणून घेऊया...**



- गंभीर व्हा : इंटर्नशिप दरम्यान सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे कामाच्या बाबतीत गंभीर असणे. प्रत्येक गोष्टीला गांभीर्याने घ्या. इंटर्नशिप ही व्यावसायिक जीवनाची पहिली पायरी आहे. अशा परिस्थितीत जर तुम्ही काम केले तर गांभीर्य दाखवले आणि याबाबत सतर्कता बाळगली तर ही गोष्ट तुमच्या वरिष्ठांच्या निदर्शनास नक्कीच येईल, ज्यामुळे तुम्हाला येणाऱ्या भविष्यात आणखी चांगल्या संधी मिळू शकतात.
- वर्क कल्चर समजून घ्या : या काळात आपल्याला वर्क कल्चर समजते. कंपनीच्या कामाशी जुळवून कसे काम करावे ? कंपनीचे जॉब मार्केट काय आहे ? तुम्हाला कोणते प्रोजेक्ट हवे आहेत ? त्यावर कसे काम करावे लागेल ? एका ठराविक मुदतीत संपूर्ण काम कसे पूर्ण करायचे हे समजून घ्या. व्यावसायिक जीवनातील प्रत्येक लहान-मोठ्या गोष्टी या इंटर्नशिप दरम्यान शिकवल्या जातात.त्यामुळे हा टप्पा प्रत्येक उमेदवारासाठी खूप महत्त्वाचा असतो.
- गोष्टी शिकण्यात स्वारस्य दाखवा : हा असा टप्पा आहे जिथे तुम्ही सर्वात जास्त शिकू शकता, म्हणून तुमच्याकडे काम नसले तरीही तुमच्या वरिष्ठांशी स्वतः बोलण्याचा प्रयत्न करा. त्यांना कळू द्या की तुम्हाला प्रोजेक्ट्सवरही काम करायचे आहे.
- तुमची आवड दाखवा : ज्यामुळे त्यांना कळेल की तुम्हाला नवीन गोष्टी शिकण्यात रस आहे. यामुळे तुम्ही कामाला घाबरत नाही, तर समोरून स्वतःहून काम करा.
- डेडलाइन पाळा : व्यावसायिक जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डेडलाइन, कारण ठरलेल्या डेडलाइनमध्ये काम पूर्ण झाले नाही तर काही उपयोग होणार नाही. त्यामुळे काम वेळेत पूर्ण करून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. असे करण्यात अयशस्वी झाल्यास तुमच्या बॉस आणि वरिष्ठांवर चांगली छाप पडणार नाही. त्यामुळे या गोष्टीची विशेष काळजी घ्या.

## स्वत :ला प्रेझेंट करताना...



**कॉलेज नुकतंच संपलेलं असतं... फुलपाखरासारखे छान छान दिवस संपून आपल्याला आता ‘जॉब’ शोधायचा आहे ही जाणीव झाल्यावर ‘दुनियादारी’शी ओळख होऊ लागते आणि मग सुरू होते कसरत नोकरीसाठी अर्ज देणे... मुलाखती... होकार, नकार आणि ऑफर्स. त्याचा पहिला टप्पा असतो तो स्वतःची व्यावसायिक ओळख करून देण्याचा..**

सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो तो कुठल्याही नोकरीच्या अर्जात स्वतःला प्रेझेंट करण्याचा आणि कॉलेजच्या मार्कांच्या शर्यतीत, अभ्यासक्रम संपवण्याच्या शिक्षणात आपल्याला स्वतःला नेमकं प्रेझेंट कसं करायचं हे कुणीच शिकवत नाही. अनेकदा इंटरनेटवरचे-मित्रमंडळींचे फॉरमॅट वापरून तयार केलेला सीव्ही आपलं नाव डकवून पाठवून दिला जातो. अपुऱ्या आणि लक्षवेधी नसलेल्या सीव्ही आणि अर्जांमुळे आपण अगदी परफेक्ट उमेदवार असलो तरीही बाजूला फेकले जातो. त्यामुळे पदवीधर होत असतानाच आपल्या नोकरीच्या अर्जावर आणि आपण स्वतःला कशा प्रकारे नोकऱ्यांच्या शर्यतीत उभे करतो यावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

### प्रोफेशनल संबंध टिकवण्यासाठी...

आपल्या सीव्हीमधील स्पेलिंग ऑनलाइन मोफत उपलब्ध असलेल्या ‘ग्रामरली’सारखे टूल्स वापरून योग्य आहेत की नाही हे आवर्जून तपासावे, चुकूनही चुकीचे स्पेलिंग सीव्हीमध्ये गेल्यास ते निष्काळजीपणाचे लक्षण मानले जाते. यासोबतच आपला सीव्ही पीडीएफमध्ये सेव्ह करून ठेवावा. सध्याच्या काळात नोकरीसाठी उमेदवार गृहीत धरताना आवर्जून केली जाणारी गोष्ट म्हणजे त्या उमेदवाराच्या सोशल मीडियाची तपासणी. आपला वैयक्तिक सोशल मीडिया नोकरी देणाऱ्यांकडून आपल्याला गृहीत धरण्याआधी पाहिला जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे आपल्या वैयक्तिक सोशल मीडियावरदेखील प्रक्षोभक, अश्लील किंवा वादग्रस्त मजकूर टाळावा. अतिशय वैयक्तिक फोटोदेखील शक्यतो फेसबुकसारख्या साइटवर टाळावेत. नोकरी शोधण्यासाठी आपण प्रोफेशनली कोण आहोत याबाबत ओळख करून देण्यासाठी आणि प्रोफेशनल संबंध टिकवण्यासाठी वापरली जाणारी महत्त्वाची सोशल मीडिया साइट म्हणजे ‘लिंक्ड इन’. या साइटकडे बहुतांश जणांचे दुर्लक्ष होते. अनेकदा या साइटवर प्रोफाइल तयार करून पुन्हा ती कधीही उघडली जात नाही. खरे तर आपल्या सीव्हीप्रमाणेच आपण आपल्या क्षेत्राच्या बाबतीत सजग आहोत, हे दाखवायची उत्तम जागा म्हणजे लिंक्डइन. इथे आपल्या क्षेत्रातील लोकांना फॉलो करून महत्त्वाची माहिती मिळतेच, पण आपल्याला नोकरी मिळण्याच्या अनुषंगाने यावर अनेक महत्त्वाचे संपर्क मिळू शकतात. त्यामुळे ही साइट तयार करून वेळोवेळी अपडेट ठेवणे गरजेचे आहे. या साइटचा उल्लेख सीव्हीमध्ये केल्यास तो सीव्हीमधील आणखी एक ठळक मुद्दा होऊ शकतो.

### ईमेलवरूनच संपर्क करा...

नोकरी शोधतानाची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे कव्हर लेटर. अनेकदा नव्याने नोकरी शोधणारे उमेदवार सोशल मीडिया साइट्सवरच्या नोकरीच्या जाहिरातींना प्रतिसाद देत आपला नंबर तिथे टाकून निवांत नोकरीसंबंधी कॉल येईल असा विचार करतात. कुठल्याही एचआरच्या वैयक्तिक सोशल मीडिया प्रोफाइलवर, मेल किंवा



व्हॉट्सॲपवर फक्त निनावी, विचित्र नाव असलेली सीव्हीची फाइल पाठवून मोकळे होतात, ही अत्यंत अनप्रोफेशनल बाब असून ते कटाक्षाने टाळावे. मग नवीन व्यक्तीशी जॉबसंबंधी संपर्क करताना तो कसा करता येईल? यासाठी कव्हर लेटरचा वापर केला जातो. ज्याला नोकरीसाठी अर्ज करायचा आहे, त्याच्या नावे हे कव्हर लेटर अत्यंत औपचारिक भाषेत आणि मुद्देसूद लिहावे. या पत्रात साधारणतः तीन परिच्छेद असावेत, ज्यात पहिल्या परिच्छेदामध्ये आपले नाव, आपल्याला या व्यक्तीचा संपर्क कुठून मिळाला आणि हे पत्र कशासाठी आहे याचा उल्लेख असावा. दुसऱ्या परिच्छेदात आपले शिक्षण, अनुभव आणि नोकरीसाठी आपल्यात असलेले गुण या गोष्टींचा उल्लेख आणि शेवटच्या परिच्छेदात आपणच या नोकरीसाठी योग्य उमेदवार का आहोत यासह आपल्याला या नोकरीच्या उमेदवारीसाठी गृहीत धरण्याची विनंती असावी. कुणालाही नोकरीसंबंधी संपर्क करताना जोपर्यंत वेगळा मार्ग सांगितला जात नाही, तोपर्यंत फक्त आणि फक्त ईमेलवरूनच केला जावा. सीव्हीप्रमाणेच कव्हर लेटरदेखील प्रत्येक नोकरीच्या पदासाठी वेगवेगळे असावे. अर्थात, अर्जाचा मूळ नमुना एकच असला तरी त्यात नोकरी काय आहे त्याप्रमाणे वारंवार बदल केले जावेत. ईमेलच्या सब्जेक्टमध्ये कोणत्या पदासाठी अर्ज करत आहोत याचा उल्लेख जरूर असावा. यासोबत कुणाला मेल करत आहोत त्यांचा उल्लेख आणि दोन- तीन ओळींमध्ये ईमेलचे कारण लिहीत. याच ईमेलमधून सीव्ही आणि कव्हर लेटर पाठवावे. वॉक इन इंटरव्ह्यूमध्ये जाताना त्यांनी दिलेल्या सूचनांबरोबरच आपल्या अर्जाची आणि सीव्हीची रंगीत प्रत, आपले सर्व डॉक्युमेंट्स आणि त्यांची झेरॉक्स आवर्जून सोबत असावी. आपली सर्व कागदपत्रे स्कॅन करून कायम ड्राव्हर किंवा क्लाऊड स्टोरेजमध्ये सेव्ह ठेवावीत. अतिशय लहान-लहान वाटणाऱ्या या गोष्टी अंमलात आणल्यास आपली प्रोफाइल नोकरी देणाऱ्याच्या नजरेत ठळकपणे राहते. नोकरी शोधताना आपल्या चांगल्या प्रोफाइल आणि स्किलसेटबरोबरच या गोष्टी आपल्याला सहज नोकरीच्या स्पर्धेत पुढे नेऊ शकतात.

### कौशल्यांचे ‘कीवर्डस्’ शोधा...

आपण कुठलाही नोकरीचा अर्ज भरल्यावर मुलाखत घेणारी व्यक्ती आपला सीव्ही सर्वप्रथम बघते. हा सीव्ही लक्षात राहणारा आणि सुव्यवस्थित असा तयार केल्यास आपल्याला नोकरी मिळण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते. सीव्ही तयार करताना केवळ आपली आहे ती माहिती कुठल्या तरी सरधोपट फॉरमॅटमध्ये लिहिण्यापेक्षा तो शक्य तितका ‘पर्सनालाइझ’ कसा करता येईल हे पाहावे. केवळ ब्लॅक ॲण्ड व्हाइट आणि टाइम्स न्यू रोमन फॉन्टपेक्षा सौम्य आणि गडद रंगसंगती वापरून, एखादा चांगला फॉन्ट वापरूनदेखील सीव्ही आकर्षक होऊ शकतो; परंतु हे करताना आपला सीव्ही अजिबात बटबटीत दिसता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. आपल्याला कायम आत्मस्तुती करू नये याचे धडे दिलेले असतात. सीव्हीमध्ये मात्र आपल्याला आपल्यात असलेली कौशल्ये चांगल्या शब्दांत आणि योग्य पद्धतीने मांडणे आवश्यक असते. एखाद्या व्यक्तीमध्ये असलेले लहान-लहान गुणदेखील सीव्हीमध्ये मांडल्यास सीव्ही उठून दिसू शकतो, पण यात मुख्य अडचण ही की, बऱ्याचदा एखादे कौशल्य कोणत्या शब्दांत मांडायचे हा प्रश्न असतो. म्हणूनच, आपल्या क्षेत्रातल्या कौशल्यांचे ‘कीवर्डस्’ आपण इंटरनेटवर सर्च करू शकतो आणि त्यातील आपल्याला लागू होणारे कीवर्डस् वापरून आपण आपला सीव्ही लिहू शकतो. सीव्हीच्या सुरुवातीलाच दोन- किंवा जास्तीत जास्त तीन ओळींमध्ये स्वतःची ओळख, शिक्षण आणि पद याची माहिती द्यावी. नोकरीचे अर्ज पाहणाऱ्या सगळ्यांकडे शेकडो अर्ज आलेले असतात, आपण कमीत कमी शब्दांत आपली ओळख करून दिल्यास आपल्या अर्जाकडे लक्ष वेधले जाऊन तो पूर्ण वाचला जाऊ शकतो. अर्जात आपला प्रोफेशनल फोटो, संपर्क इत्यादी माहितीचा स्पष्ट उल्लेख असावा, परंतु वैयक्तिक माहितीमध्ये वैयक्तिक छंद तसेच कौटुंबिक माहितीचा उल्लेख नोकरीसाठी संबंध नसल्यास कटाक्षाने टाळावा. ऑफिस अथवा कंपनीमधील नोकऱ्यांच्या अर्जाची छाननी करताना आपण राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी केली नसल्यास आपल्या गायन, खेळ, (यात अनेक जण ‘टीव्ही पाहणे’ हेदेखील लिहितात!!) असल्या छंदांशी त्यांना काहीही देणे-घेणे नसेल ही बाब लक्षात घ्यावी. याव्यतिरिक्त, कामाचा किंवा एखाद्या प्रोजेक्टवर काम केल्याचा अनुभव असल्यास त्याच्या उल्लेखासोबत आपण त्या ठिकाणी नेमके काय केले हे एखाद्या ओळीत नमूद केल्यास आपली त्या कामामधील भूमिका समोरच्यांपर्यंत पोहोचते. याचबरोबर लक्षात घेण्याची आणखी एक गोष्ट म्हणजे वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करताना आपण अर्ज करत असलेल्या प्रत्येक पदासाठी सीव्ही योग्य कसा होईल याची खबरदारी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ एखादा सायन्स शाखेचा उमेदवार एकाच वेळी शिक्षक आणि एखाद्या कंपनीमधील पदासाठी अर्ज करत असेल तर या दोन्ही अर्जात वेगवेगळे सीव्ही वापरून त्या - त्या पदासाठी आवश्यक असणारी कौशल्ये अधोरेखित करता येतील.



### सोशल ‘नोकरी’ प्रोफाइल

तुमच्या सोशल नेटवर्किंगसाइटच्या प्रोफाइलवरून तुम्हाला कदाचित एखाद्या नोकरीची ऑफर आली तर आश्चर्य वाटून घ्यायची गरज नाही. कारण आता अनेक कंपन्यांनी योग्य उमेदवार शोधण्यासाठी सोशल नेटवर्किंग साइटचा वापर करू लागल्या आहेत. यामुळे तुमचे साइटवरचे प्रोफाइल अपडेट असणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही कंपनीला नवे कर्मचारी नियुक्त करताना त्यांचा बायोडाटा महत्त्वाचा असतोच, पण त्याचबरोबर उमेदवारांची आणखी माहिती घेण्यासाठी, त्यांची पार्श्वभूमी तपासून पाहण्यासाठी आणि उत्तमोत्तम व्यक्तीची निवड करण्यासाठी कंपन्या सोशल नेटवर्किंग साइटमधल्या प्रोफाइलमध्ये डोकावू लागल्या आहेत. हे प्रोफाइल म्हणजे बाटोडाटाचाच पुढचा भाग असतो जणू. प्रोफाइलमधून उमेदवाराच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाचा अंदाज येतो. सगळ्याच कंपन्या असे करत नाहीत, परंतु काही कंपन्या फेसबुक, ट्विटरकडे लक्ष ठेवून आहेत. हे प्रोफाइल पाहण्याचा कंपन्यांचे हेतू संबंधित व्यक्ती आपल्या कंपनीच्या संस्कृतीमध्ये बसू शकेल की नाही, हे पाहण्याचा असतो. समजा, ट्विटरमध्ये उमेदवाराने त्याच्या क्षेत्राशी संबंधित आर्टिकल पोस्ट केली असतील तर तो आजूबाजूला घडत असलेल्या कार्यक्रमांबाबत अपडेट असल्याचे मानले जाते. पण निरर्थक ट्विट केलेले असेल तर त्यातून उमेदवाराविषयी खूप चांगले मत होईलच, असे नाही. प्रोफाइलमध्ये प्रोफेशनल संस्थांशी संलग्नता व मेंबरशिप दिसल्यावरही या कंपन्या खूष होतात. उमेदवाराची कोणाकोणाशी ओळख, मैत्री आहे, हेही त्या चाचपून पाहतात. त्यामुळे फ्रेंड रिक्वेस्ट पाठवताना व स्वीकारताना सावध राहण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात. ही पर्सनल नेटवर्किंग साइट असल्याने क्वचित पार्टीचे, धमालीचे फोटो चालू शकतात. परंतु, वारंवार पार्ट्या दिसू लागल्या किंवा हरकत घेण्यासारखे फोटो दिसू लागले तर त्याचा फटका बसू शकतो. यामुळे आता सोशल नेटवर्किंग साइटवरची प्रोफाइल्स जरा जपून हाताळणे गरजेचे आहे.

# राज्यातील बहुतांश जिल्ह्यात अवकाळीचा तडाखा; पिकांचे नुकसान, बळीराजा हवालदिल





**मुंबई(प्रतिनिधी)**–राज्यात उष्णतेनं कहर केल्यानंतर पुन्हा अवकाळी पावसाचं संकट घोंगावत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार राज्यातील बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पावसानं दमदार बॅटिंग केली आहे. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतातली पिकांना बसला असून, होता-तोंडाशी आलेलं पीक अक्षरशः आडवं झालं आहे. परिणामी बळीराजा पुन्हा एकदा दुबार संकटात सापडला आहे.

रत्नागिरीत जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील झापडे गावात जोरदार अवकाळी पाऊसाने अकरा एकर बागेचे मोठे नुकसान झाले आहे. यात हातातोंडाशी आलेल्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून, बळीराजा हवालदिल झाला आहे.

रत्नागिरीत जिल्ह्यातील लांजा तालुक्यातील झापडे गावात जोरदार अवकाळी पाऊसाने अकरा एकर बागेचे मोठे नुकसान झाले आहे. यात हातातोंडाशी आलेल्या पिकाचे मोठे नुकसान झाले असून बळीराजा हवालदिल झाला आहे.

रत्नागिरीत जिल्ह्यातील अनेक भागात शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. यात अकरा एकरमध्ये लावलेल्या पपई झाडांचं मोठं नुकसान झालं असून उभं पीक सुसाट्याच्या वाऱ्याने आडवं झालं आहे. यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने पपईचे पस्तीस लाखांचे नुकसान झाले आहे.

रत्नागिरीत जिल्ह्यातील अनेक भागात शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. यात अकरा एकरमध्ये लावलेल्या पपई झाडांचं मोठं नुकसान झालं असून उभं पीक सुसाट्याच्या वाऱ्याने आडवं झालं आहे. यात वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने पपईचे पस्तीस लाखाचे नुकसान झाले आहे.

दुसरीकडे, अवकाळी पावसाचा तडाखा भंडाऱ्याला बसला असून ८०२.१० हेक्टरवरील पीकांचं नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. कृषी विभागाचा नजरअंदाज अहवाल समोर आला असून त्यातून ही नुकसानीची आकडेवारी पुढे आली आहे.

भंडारा जिल्ह्यात १ ते ६ मे दरम्यान झालेला सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीमुळं जिल्ह्यातील ७२ गावांतील ८०२.१० हेक्टर क्षेत्रातील पिकांना फटका बसलाय.

कृषी विभागानं त्यांचा प्राथमिक नजर अंदाज अहवाल तयार केला आहे. या आपत्तीमुळं २१२३ शेतकरी प्रभावित झाले आहे. नुकसानग्रस्त पिकांमध्ये उन्हाळी भात, मका, आंबा, भाजीपाला व अन्य फळपिकांचा समावेश आहे.

# देशात पाण्याचा नव्हे तर नियोजनाचा अभाव; नितीन गडकरींनी सांगितला पाणी टंचाईवर उपाय

**मुंबई(प्रतिनिधी)**–विदर्भात शेतकरी आत्महत्या पाण्याच्या कमतरतेमुळे होत आहे. देशातील काही भागात मुबलक पाणी आहे, तर काही भागात दुष्काळ सारखी स्थिती आहे. किंबहुना, देशात पाण्याची कमतरता नाही, तर आपल्यामध्ये पाण्याबद्दलच्या नियोजनाचा अभाव आहे, अशी खंत व्यक्त करत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी विदर्भातील शेतकरी आत्महत्या आणि पाण्याच्या टंचाईबाबत भाष्य केलं आहे. पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवनिमित्त नागपुरात 'जलसंवाद आणि जलक्रांती परिषद' आयोजित करण्यात आली आहे. त्या प्रसंगी बोलताना नितीन गडकरींनी या विषयी भाष्य केलं आहे.



मागील २५ वर्षात आमच्या पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेने विदर्भात भक्कम काम केले आहे. १७ मे आणि १८ मे रोजी नागपुरात जलसंवाद आणि जलक्रांती परिषद आयोजित केली आहे. यामध्ये नाना पाटेकर, आमिर खान, मकरंद अनासपुरे या अभिनेत्यांसह जलसंधारण क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे देशभरातील तज्ज्ञ सहभागी होतील.

देशात जशी हायवे ग्रीड आहे, पॉवर ग्रीड आहे, त्याच पद्धतीने 'वॉटर ग्रीड' करणे ही आवश्यक आहे. जिथे पूर येतात तिथून मोठे कॅनाल करून पाणी दुर्भिक्ष्य असलेल्या भागात आणण्याची गरज आहे. त्यासाठीचे मोठे प्रकल्प सरकारने करावे, मतदारसंघ पातळीवर लोकप्रतिनिधींनी त्यांच्या पातळीवर काम करावे, तर गावांनी त्यांच्या पातळीवर जलसंधारणला लोकांची चळवळ बनवावे. लाखो प्रयत्न होतील, तेव्हा पाण्याच्या दुर्भिक्ष्याचे प्रश्न सुटेल, असेही नितीन गडकरी म्हणाले.

पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था गेले २५ वर्षे या क्षेत्रात काम करीत आहे. आम्ही पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला साडे तीनशेपेक्षा जास्त तलाव बांधून दिले. त्यामुळे त्यांच्या सिंचित शेतीचं प्रमाण वाढलं. तसेच अवतीभोवतीच्या गावांमध्येही भूजल पातळी वाढली. त्या तलावाची खोदलेली माती आम्ही रस्ते निर्मितीसाठी वापरली. बुलढाणामध्ये ही अशाच पद्धतीचा पॅटर्न वापरून जलसंधारणाचे काम झाले. रस्ते निर्मितीसाठी मातीही उपलब्ध झाली, आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले, अशी माहितीही केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी दिली.

# मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात पंजाबचे मंत्री संजीव अरोरा यांना सात दिवसांची ईडी कोठडीत

**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**–मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अटक करण्यात आलेले पंजाब सरकारमधील मंत्री डरपक्षशर्शीं ीर यांना न्यायालयाने सात दिवसांच्या ईडी कोठडीत पाठवले आहे. रविवारी सकाळी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यानंतर अंमलबजावणी संचालनालयाने पुढील चौकशीसाठी त्यांची कोठडी मागितली आणि न्यायालयाने ती मंजूर केली.

सध्या संजीव अरोरा यांची गुरुग्राममधील एमजी रोड येथील ईडी कार्यालयात कसून चौकशी सुरू असून, आर्थिक व्यवहार, कंपन्यांचे दस्तऐवज आणि कथित बनावट निर्यातीसंदर्भातील माहिती तपासली जात आहे. अरोरा हे पंजाबमधील लुधियाना वेस्ट मतदारसंघाचे आमदार असून राज्य सरकारमध्ये महत्त्वाची जबाबदारी सांभाळत आहेत.

ईडीने शनिवारी चंदीगड आणि गुरुग्राम येथील त्यांच्या विविध ठिकाणांवर मोठी छापेमारी केली होती. जवळपास दहा तास चाललेल्या या कारवाईनंतर शनिवारी सायंकाळी पाचच्या सुमारास त्यांना चंदीगडमधून अटक करण्यात आली. या कारवाईदरम्यान अनेक महत्त्वाचे कागदपत्रे, डिजिटल पुरावे आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित माहिती जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.



ईडीच्या प्राथमिक तपासानुसार, संजीव अरोरा आणि त्यांच्याशी संबंधित काही कंपन्यांवर तब्बल १५७.१२ कोटी रुपयांच्या कथित बनावट विक्री व्यवहारांचे आरोप आहेत. तसेच शेल कंपन्यांच्या माध्यमातून बनावट निर्यात दाखवून आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या व्यवहारांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैशांची अफरातफर आणि मनी लॉन्ड्रिंग झाल्याचा दावा ईडीकडून करण्यात येत आहे.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, काही कंपन्यांनी कागदोपत्री व्यवहार दाखवून परदेशी निर्यातीचे व्यवहार उभे केले होते. मात्र प्रत्यक्षात मालाची देवाणघेवाण झाली नसल्याचा संशय आहे. या व्यवहारांच्या माध्यमातून काळा पैसा पांढरा करण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता तपासली जात आहे.

दरम्यान, या कारवाईनंतर पंजाबच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. विरोधकांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर सरकारला घेरण्यास सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे, संजीव अरोरा यांच्याकडून अद्याप या आरोपांवर अधिकृत सविस्तर प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

ईडीकडून पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात असून, संबंधित कंपन्या आणि आर्थिक व्यवहारांची साखळी तपासली जात आहे.

# व्यवसायिक वाहन चालकांनी व्यवहारिक मराठी शिकणे ही काळाची गरज; परिवहन मंत्री सरनाईक

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्रातव्यवसायिक प्रवासी वाहन चालवणाऱ्या प्रत्येक चालकाला व्यवहारिक मराठी येणे अत्यावश्यक आहे. मराठी शिकणे म्हणजे कोणावर बंधन घालणे नव्हे, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि अस्मितेचा आदर करणे आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. रंगशारदा मंदिर येथे आयोजित हिंदी भाषिकांच्या नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या वर्धापन दिन व जल्लोष मेळावा कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, हिंदी भाषिक चालकांना स्वयंस्फुर्तीने मराठी शिकवण्यासाठी हाजी अराफत शेख यांनी केलेला अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. अशा पद्धतीने चालक स्वतःहून पुढे येत असतील, तर शासनदेखील त्यांना सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. ते पुढे म्हणाले, चालक बांधवांनी मराठी शिकण्यासाठी तीन महिन्यांची मुदत मागितली होती. शासनाने त्यांना तब्बल १०५ दिवसांची मुदत दिली आहे. मात्र, या कालावधीत जर त्यांनी किमान 'व्यवहारिक मराठी ' आत्मसात केली नाही, तर १६ ऑगस्टपासून त्यांच्यावर कारवाई करणे अटळ ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला.



राज्यातील रिक्षा, टॅक्सी, बस आणि ट्रक चालकांच्या योगदानाचा गौरव करताना मंत्री सरनाईक म्हणाले, व्यवसायिक वाहन चालक हा केवळ चालक नसून महाराष्ट्राच्या अर्थचक्राला गती देणारा खरा शिल्पकार आहे. वाहतूक क्षेत्र हे समाजाशी थेट जोडलेले असल्याने चालकांचे बोलणे, वर्तन आणि भाषा यावर संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा अवलंबून असते, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची भूमी असल्याचे सांगत त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. प्रवासी वाहनात बसल्यानंतर त्याला आपल्या भाषेत संवाद साधता आला पाहिजे. 'नमस्कार', 'कुठे जायचे?', 'किती भाडे होईल?' एवढे तरी व्यवहारिक मराठी प्रत्येक चालकाला आले पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

परराज्यातून महाराष्ट्रात येऊन प्रामाणिकपणे काम करणाऱ्या चालकांचे स्वागत करतानाच, स्थानिक भाषा आत्मसात केल्यास प्रवासी, पोलीस, प्रशासन आणि स्थानिक नागरिकांशी संवाद अधिक सुलभ होईल, गैरसमज कमी होतील आणि सेवा अधिक सुसंस्कृत बनेल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

नवभारतीय शिव वाहतूक संघटनेने चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असल्याचे सांगत, राज्य सरकारच्या माध्यमातून चालकांसाठी विविध कल्याणकारी योजना, प्रशिक्षण उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

# धर्मांतराला साथ देणाऱ्या राजकीय पक्षांची मान्यता रद्द करा; मंत्री नितेश राणे

**मुंबई (प्रतिनिधी)**–नाशिकमधील टीसीएस कंपनीत घडलेल्या 'कॉर्पोरेट जिहाद' प्रकरणातील आरोपी निदा खानचे समर्थन करणाऱ्या 'एमआयएम'वर मंत्री नितेश राणे यांनी शनिवारी जोरदार प्रहार केला. हिंदू मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या निदा खानसारख्या आरोपीला वाचवण्यासाठी काही राजकीय पक्ष आणि संघटना उघडपणे मैदानात उतरल्या आहेत. अशा जिहादला समर्थन देणाऱ्या राजकीय पक्षांची मान्यता निवडणूक आयोगाने तातडीने रद्द केली पाहिजे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

पुणे जिल्ह्यातील एखतपूर-मुंजवडी येथे आयोजित 'विराट हिंदू संमेलना'त ते बोलत होते. नितेश राणे म्हणाले, हिंदू धर्माच्या नावाने जर कोणी चुकीचे काम किंवा स्वतःचे दुकान चालवत असेल, तर त्याचे समर्थन हिंदू कधीही करत नाहीत आणि करूही नये. मग ते अशोक खरात प्रकरण असो किंवा अन्य कोणतेही. अशा प्रकरणातील आरोपींना जेव्हा न्यायालयात नेले जाते, तेव्हा त्यांच्या समर्थनार्थ हिंदू समाज कधीही रस्त्यावर उतरून आंदोलने करत नाही.

पण दुसरीकडे, नाशिकमध्ये कॉर्पोरेट जिहाद घडवून हिंदू तरुणींचे धर्मांतर करण्यात आले. हे दुष्कर्म करणाऱ्या निदा खानला वाचवण्यासाठी हैदराबादचे खासदार असदुद्दीन ओवैसी, एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील आणि छत्रपती संभाजी नगरमधील स्थानिक नगरसेवक सक्रिय झाले आहेत.

# सोने-चांदीच्या दरात पुन्हा वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)**–देशभरात सोने आणि चांदीच्या दरांमध्ये सातत्याने चढ-उतार होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या आठवडाभरात सोन्याच्या किंमतीत मोठी वाढ नोंदवली गेली असून, त्यामुळे ग्राहकांनी खरेदीपूर्वी ताजे दर तपासणे महत्त्वाचे झाले आहे. विशेषतः २४ कॅरट आणि २२ कॅरट सोन्याच्या दरांमध्ये मोठी वाढ झाली आहे.गेल्या एका आठवड्यात २४ कॅरेट सोन्याच्या किंमतीत सुमारे १,६४० रुपयांची वाढ झाली आहे. तर २२ कॅरट सोनेही जवळपास १,५०० रुपयांनी महागले आहे.

राजधानी दिल्लीमध्ये आज २४ कॅरट सोन्याचा दर प्रति १० ग्रॅम १,५२,५०० रुपयांवर पोहोचला आहे. तर २२ कॅरट सोन्याचा भाव १,३९,८०० रुपये प्रति १० ग्रॅम इतका नोंदवला गेला आहे.दरम्यान, दिल्लीच्या सराफा बाजारात शुक्रवारी (८ मे) सोन्याच्या किंमतीत १०० रुपयांची घसरण होऊन दर १,५५,९०० रुपये प्रति १० ग्रॅम इतका होता. आंतरराष्ट्रीय बाजारात हाजिर सोन्याचा दर सध्या ४,७२१ डॉलर प्रति औंस या स्तरावर व्यवहार करत आहे.सोनेप्रमाणेच चांदीच्या किंमतीतही मोठी वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात चांदी जवळपास १० हजार रुपयांनी महागली आहे. १० मे रोजी सकाळी चांदीचा दर प्रति किलो २,७५,००० रुपयांवर पोहोचला आहे. याआधी ८ मे रोजी दिल्लीच्या सराफा बाजारात चांदीचा दर २०० रुपयांनी घसरून २,६१,३०० रुपये प्रति किलो झाला होता. मात्र त्यानंतर पुन्हा तेजी दिसून आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीचा दर ८१.१४ डॉलर प्रति औंसवर व्यवहार करत आहे.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता राज्यभरातील विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेकडे लागले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे ८ मेपासून सुरू झाली असून शिक्षण विभागाने संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. यंदाही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच पार पडणार असून विद्यार्थ्यांना घरबसल्या अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रियेची 'झिरो राऊंड' म्हणजेच शून्य फेरी ८ मे ते २० मेदरम्यान पार पडणार आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग-१ भरता येणार आहे. तर ११ मे ते १३ मे या दरम्यान विद्यार्थ्यांना भाग-१ आणि भाग-२ पूर्ण करण्याची संधी दिली जाणार आहे. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीनुसार किमान १ ते जास्तीत जास्त १० कनिष्ठ महाविद्यालयांची निवड करता येणार आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी विद्यार्थी वेगवेगळ्या महाविद्यालयांचा पर्याय निवडू शकतात.

१४ आणि १५ मे रोजी तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्यासाठी १६ मे हा दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. यानंतर २१ मेपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. २१ आणि २२ मे हे अर्जाचा भाग-१ आणि भाग-२ भरण्याचे अंतिम दिवस असतील. अर्ज सादर करण्यासाठी सकाळी ६ वाजेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

## Change In Name

My Old Name is **AMIT SINGH GOPAL SINGH TEHRA** which now I am changing as New Name AMEET SINGH GOPAL SINGH TEHRA Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Sign By: AMEET SINGH GOPAL SINGH TEHRA s/o Gopal Singh Tehra, H. No. 2-11-33/1,Borban factory,Nanded,P.O.NandedTQ. DIST. NANDED. 431 601 Mob.9075555677

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात येते की, ना.वा.श. मनपा हद्दीतील आनंदनगर, सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था म. असदुल्लाबाद, नांदेड येथील संस्थेच्या मालकीच्या सर्व्हे नं. ३९ मधील सि.टी. सर्व्हे नं. १०२७४ पैकी प्लॉट नं. १०६ ज्याचे क्षेत्रफळ २३०८.६२ चौ. फुट म्हणजे २१४.५० चौ. मी. आहे व ज्याच्या चतुःसीमा -पूर्वेस-वसंतनगर सोसायटी, पश्चिमेस-प्लॉट नं. १०५

दक्षिणेस-वसंतनगर सोसायटी उत्तरेस-६ मीटर रुंद रोड

येणेप्रमाणे चतुःसीमेच्या आतील प्लॉट नंबर १०६ हा संस्थेने संस्थेचे सभासद श्री अनंत पि. मधुकरराव पाटील यांना प्लॉट वाटप प्रमाणपत्राद्वारे वाटप केलेला असून, त्याबाबत संस्थेने त्यांच्या त्यांच्या नावे प्लॉट वाटप प्रमाणपत्रसुद्धा दिलेले आहे.

हे की, त्यानंतर संस्थेचे वर नमूद सभासद श्री अनंत पि. मधुकरराव पाटील यांदी सदरील प्लॉटचा विकास करण्यासाठी श्री प्रितम लंचनकुमार कंदी यांच्याशी नोंदणीकृत विकसन करारनामा दस्त क्र. २३९८/२०२३ आधारे (Registered Development Agreement) सदरील प्लॉट क्र. १०६ क्षेत्रफळ २१४.५० चौ. मी. वर होणारे प्रस्तावित एकूण बांधकाम क्षेत्रफळ ७५९.८५ चौ. मीटर बांधकामाची आपसात ५० टक्के, ५० टक्के प्रमाणे विभागणी करण्याचा करार केला असून, त्या विकसन करारनाम्याद्वारे विकसक श्री प्रितम लंचनकुमार कंदी यांनी सदरील प्लॉटवर बांधकाम केलेल्या अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०१ क्षेत्र.९०.९८ चौ. मी. सदनिका क्र. २०२ क्षेत्र.९८.९७ चौ. मी. असे एकूण ४ (चार) सदनिकांचे एकूण क्षेत्रफळ ३७९.९२ चौ. मीटर हे विकसक श्री प्रितम लंचनकुमार कंदी यांच्या हिस्यास आले असल्याचे दिसून येत आहे. तसेच आता विकसक श्री प्रितम लंचनकुमार कंदी यांनी त्यांच्या हिस्यास आलेल्या वर नमूद प्लॉट क्र. १०६ वरील इमारतीमधील ४ (चार) सदनिका त्यांच्या नावे हस्तांतर करून त्याबाबतचे वाटप वाटप प्रमाणपत्र (Allotment Letter) त्यांच्या नावे देण्याबाबत संस्थेकडे आवश्यक ती सर्व कागदपत्रं सादर करून संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर केला आहे. तरी कागदपत्रांची छाननी करून वर नमूद प्रमाणे विकसक श्री प्रितम लंचनकुमार कंदी यांच्या नावे वर नमूद प्लॉट क्र. १०६ वरील इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०१ क्षेत्र.९०.९८ चौ. मी. सदनिका क्र. १०२ क्षेत्र.९८.९७ चौ. मी. तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०१, क्षेत्र.९८.९० चौ. मी. सदनिका क्र. २०२ क्षेत्र. ९८.९७ चौ. मी. हस्तांतरण करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास अथवा सदर फ्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत संबंधितांनी आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या कार्यालयात लिखित स्वरूपात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध केले आहे.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष/सचिव
आनंदनगर सहकारी भाडेकरू मालकी
गृहनिर्माण संस्था म. असदुल्लाबाद

मार्फत
अॅड. नरेश साहेबराव देशमुख
राजेंद्रनगर, नांदेड
मो. ९४२२१७००३०

# अवघ्या एका आठवड्यात पाच वाघांचा मृत्यू



**नवीदिल्ली (वृत्तसंस्था)** –मध्यप्रदेशातील 'कान्हा' व्याघ्र प्रकल्पात एकानंतर एक अशा पाच वाघांचा 'केनाईन डिस्टेंपर वायरस' म्हणजेच सीडीव्ही-मुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. २१ एप्रिल ते २८ एप्रिल दरम्यान टी -१४१ या वाघिणीसह तिच्या चार बछड्यांचे एका नंतर एक झालेले मृत्यू केनाईन डिस्टेंपर वायरसचा परिणाम असल्याचे स्पष्ट झाले आहे. कान्हा व्याघ्र प्रकल्पातील अधिकाऱ्यांनी अशक्त होऊन मृत्युमुखी पडलेल्या वाघिणी आणि चारही बछड्यांचे नमुने जबलपूर येथील 'स्कूल ऑफ वर्ल्ड लाइफ फॉरेन्सिक अँड हेल्थ' या प्रयोगशाळेत पाठवले होते. प्रयोगशाळेने पाचही वाघांचा मृत्यू केनाईन डिस्टेंपर वायरसमुळे झाल्याचे प्रमाणित केले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे कॅनाईन डिस्टेंपर वायरस 'कुत्रा वर्गीय' प्राण्यांचा आजार असून सध्या तो 'मांजर वर्गीय' प्राण्यांमध्ये म्हणजेच लरपळपश ऐवजी षशश्रळपश वर्गीय प्राण्यांमध्ये दिसून येत आहे. त्यामुळेच वाघ आणि बिबट हे मांजर वर्गीय प्राणी केनाईन डिस्टेंपर वायरसमुळे आजारी पडत आहेत. वन्य प्राण्यांच्या संरक्षणाच्या अनुषंगाने ही अत्यंत धोकादायक आणि आव्हानात्मक बाब आहे. वाघीण आणि तिच्या चार बछड्यांच्या अशा पद्धतीने कुत्र्यापासून संक्रमण झालेल्या विषाणूमुळे मृत्यू झाल्यानंतर कान्हा व्याघ्र प्रकल्पाचा प्रशासन तसेच संपूर्ण मध्य प्रदेशातील वनविभाग सावध झाला आहे.

कान्हा व्याघ्र प्रकल्पातील ज्या 'सरही' सेक्टरमध्ये ही घटना घडली आहे, तिथे पाच वर्ग किलोमीटरचा भाग 'नो गो झोन' करण्यात आला आहे. संपूर्ण परिसरात इतर वाघांवर नजर ठेवण्यासाठी हत्तीवरून गस्त केली जात आहे. परिसरात ४० कॅमेरा ट्रॅप बसवण्यात आले आहे. जंगलातील पानवठ्यांमधील पाण्याची सतत सॅम्पलिंग केली जात आहे. प्राण्यांच्या विष्ठेची ही सॅम्पलिंग केली जात आहे. कान्हा व्याघ्र प्रकल्पाच्या अवतीभवतीच्या सुमारे ८० गावातील कुत्र्यांचे लसीकरण सुरू करण्यात आले आहे दरम्यान, सरही सेक्टरच्या जवळपासच्या गावकऱ्यांनी वाघांच्या मृत्यू संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली असून वाघांचा मृत्यू दुर्दैवी असून पर्यटन क्षेत्रावर अत्यंत विपरीत परिणाम घालणारा ठरेल अशी भीती व्यक्त केली आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र संक्रमण आणखी वाघापर्यंत आणि इतर वन्य प्राण्यांपर्यंत वाढणार नाही, यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला आहे.

कान्हा व्याघ्र प्रकल्पात एकानंतर वाघीण आणि तिच्या चार बछड्यांचा (एकूण पाच वाघ) मृत्यू झाल्यानंतर महाराष्ट्रातही वाघ आणि इतर वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# खा. श्रीकांत शिंदेंचा महाराष्ट्र दौरा जाहीर, २२ जिल्ह्यातील ७० विधानसभा मतदारसंघात जाणार, थेट कार्यकर्त्यांशी संवाद



**मुंबई (प्रतिनिधी)**–शिवसेना शिंदे गटाचे खासदार श्रीकांत शिंदे हे येत्या १६ मे पासून महाराष्ट्रातील २२ जिल्हे आणि ६५ ते ७० विधानसभा मतदार संघाचा दौरा करणार आहेत. त्यांचा हा दोन महिन्यांचा दौरा असणार आहे. तर १५ जुलै रोजी त्यांचा हा दौरा संपणार आहे. या दौऱ्यात खासदार श्रीकांत शिंदे थेट कार्यकर्त्यांनी संवाद साधणार आहेत. तसेच SIR मोहिमेअंतर्गत शिवसेना BL 1 BL 2 यांच्या नेमणुकांचा आढावा या दौऱ्यात घेतला जाणार आहे.

तीन टप्प्यात हा दौरा होणार असून पहिल्या टप्प्यात नाशिक, धुळे, आहिल्यानगर, बीड, अमरावती, अकोला हा दौरा असणार आहे. दुसऱ्या टप्प्यात जळगाव, नंदुरबार, यवतमाळ, वाशिम, नांदेड, हिंगोली, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली सा दौरा असणार आहे. तर तिसऱ्या टप्प्यात बुलढाणा, जालना, नागपूर, भंडारा, गोंदिया, ठाणे आणि पालघर असा हा दौरा असणार आहे.

३० मार्च रोजी महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदार संघात नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यात दौरा केला आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या आधी ६५ ते ७० ठिकाणी दौरे केले आहेत. एकनाथ शिंदे यांनी २२ जिल्ह्यात असलेल्या ११ मंत्र्यांना संपर्क प्रमुख म्हणून दोन जिल्हे दिले आहेत. ताकद वाढवण्याचं काम केल्याची माहिती शिवसेना शिंदे गटाचे नेते सचिन भाऊसाहेब चौधरी यांनी दिली. आता श्रीकांत शिंदे यांचा २२ जिल्ह्याचा दौरा १६ मे ते १५ जुलै दरम्यान करण्यात येणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने संघटन बांधण्यासाठी हा दौरा होणार आहे. यापूर्वी ज्या लोकांना पद दिली त्याचं कामच मूल्यमापन केलं जाईल. उत्तर महाराष्ट्रातून हा दौरा सुरू होणार असल्याची माहिती सचिन चौधरी यांनी दिली. या दौऱ्याच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांना संघटनात्मक ताकद देण्याचं काम करण्यात येणार आहे. हा दौरा संघटनेच्या दृष्टीने महत्वाचा असणार आहे.

दरम्यान, श्रीकांत शिंदे हे तीन टप्प्यात महाराष्ट्र दौरा करणार आहेत. त्यांच्या दौऱ्यामुळं शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना मोठं बळ मिळणार आहे. विशेष म्हणजे ते थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. आगामी काळात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी शिवसेने आणि श्रीकांत शिंदे यांनी उचललेलं मोठं पाऊल आहे.



**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७११७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# सामान्य नागरिकांचे प्रश्न तत्काळ सोडवा -जिल्हाधिकारी

## ◆ नायगाव येथे 'महाराजस्व अभियान'; दोन हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला विविध योजनांचा लाभ

**नांदेड (प्रतिनिधी)** –शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत नायगाव तहसील परिसरात दि. ८ मे रोजी आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद लाभला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडविण्यावर भर देण्यात आला. तालुक्यातील सुमारे एक हजार नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवत विविध योजनांचा लाभ घेतला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रशासनाची असल्याचे सांगितले. सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, त्यांच्या समस्या एकाच ठिकाणी तत्काळ सोडविल्या जाव्यात, हा या अभियानामागील मुख्य उद्देश आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख दृष्टीकोन ठेवून नागरिकांच्या अडचणी संवेदनशीलतेने सोडवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर न बसता जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सामान्य नागरिकांमध्ये खुर्ची टाकून बसले हे विशेष. यावेळी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. महसूल, पुरवठा, कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, महावितरण, भूमी अभिलेख आदी विभागांनी उभारलेल्या स्टॉल्समुळे नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

या शिबिरात एकूण १२ विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात आले होते. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित बँक केवायसी पूर्ण करून नवीन अर्ज स्वीकृत करण्यात आले. पुरवठा विभागामार्फत डिजिटल रेशन कार्डचे वाटप तसेच दुरुस्तीबाबत माहिती देण्यात आली. महसूल विभागाने नागरिकांना जिवंत व डिजिटल सातबाराचे विनामूल्य वितरण केले, तर रहिवासी, उत्पन्न व जातीच्या प्रमाणपत्रांसाठी नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. भूमी अभिलेख विभागामार्फत पी. आर. कार्ड, मोजणी प्रक्रिया व जमीन नोंदींबाबत नागरिकांना सविस्तर माहिती देण्यात आली. कृषी विभागाने पी. एम. किसान, महाडीबीटी, महाविस्तार यांसारख्या योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

आरोग्य विभागाकडून 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा फुले जनआरोग्य योजना' याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महावितरण विभागाने 'मागेल त्याला सोलर' व 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' या सारखी माहिती दिली. महिला व बालविकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, बेबी केअर किट तसेच गरोदर मातांसाठी पोषण आहार योजनांची माहिती देण्यात आली. घरकुल योजना आणि वन विभागाच्या विविध योजनांबाबतही नागरिकांनी मोठ्या प्रमाणात माहिती घेतली.

या प्रसंगी विविध योजनांतील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. नागरिकांनी शासनाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रशासनाचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील नागरिकांना अशा शिबिरांमुळे मोठा दिलासा मिळत असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. यावेळी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत महिला शेतकरी श्रीमती आशाताई लक्ष्मण कदम रा. बाबुळगाव, महानंदा बापुराव तिजारे रा. पाटोदा यांना तुषार संचसाठी पूर्वसंमती पत्र देण्यात आले.

३२ आयुष्मान गोल्डन कार्ड, १० आयुष्मान वयवंदना कार्ड, ६० लाभार्थी मधुमेह व उच्च रक्तदाब स्क्रिनिंग तपासणी, ३ क्षय रोगी रुग्णास फूड बास्केटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास नायब तहसीलदार विजय येरावाड, नगर पंचायतच्या मुख्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# अवैध व्यवसायविरोधी मोहिमेत ७४ गुन्ह्यांमध्ये १०० जणांविरुद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –१ ते ३१ मे, २०२६ दरम्यान नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायविरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेच्या नवव्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात दिवसभरात गुटखा विक्रीच्या ३ कारवाया करण्यात आल्या असून, यातील आरोपीतांकडून ५२,४१८ रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपींविरुद्ध कलम १२३ भारतीय न्यायसंहिता अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यास दहा वर्षाच्या कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

त्याचबरोबर मटका-जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण ४१ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत २९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांच्याकडून ६,१५,८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच अवैध दारू विक्री करणाऱ्या ३७ इसमांविरुद्ध ३३ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून ८ लाख ९७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्धही २ गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून २३ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाई सोबतच शस्त्र अधिनियमान्वये ४, कोप्टा अन्वये ३, तर इतर अधिनियमाखाली मिळून एकूण ७४ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ६६ लाख १५ हजार ८५३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### 'खबर' हेल्पलाईनला वाढता प्रतिसाद

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना देता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, सदर हेल्पलाईनला नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

### नांदा सौख्यभरे

**काकांडीकर–पवार**

नांदेड येथील श्रावस्ती नगरातील रहिवासी सौ. सुजाता व अशोकराव हनवते काकांडीकर यांची तृतीय कन्या डॉ. वैशाली यांचा मंगलपरिणय मुदखेड तालुक्यातील खुजडा येथील रहिवासी सौ. संघमित्रा व यशवंतराव पवार यांचे सुपुत्र चि.डॉ. काशिनंद यांजसमवेत सोमवार, दि. ११ मे २०२६ रोजी दुपारी १२.३५ वाजता लक्ष्मी गार्डन मंगल कार्यालय तरोडा बु. येथे संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक

# ७ जुगाऱ्यांना अटक; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरापासून जवळच असलेल्या गोपाळचावडी- बाबुळगाव रस्त्यावरील एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली. त्यात ७ जुगाऱ्यांवर कारवाई करून ५ लाख ५ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. अवैध धंद्याविरोधात पुन्हा एकदा क्रॅक डाऊन मोहिमे- अंतर्गत पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.



नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, अंमलदार अर्जुन मुंडे, विष्णू कल्याणकर, संतोप पवार, गवेंद्र सिरमलवार, शेख फैयाज यांच्या पथकाला ९ मे रोजी गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने गोपाळ चावडी-बाभुळगाव रस्त्यावरील शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. जुगारी दिनेश लक्ष्मणराव जोंधळे (रा. जुना मोंढा), गुलाब सदाशिव घोरबांड (रा. ज्ञानेश्वर नगर, सिडको), विजय हरिभाऊ पाटील (रा. वात्सल्य नगर सोसायटी, हडको), दत्तराव गोविंदराव फुलकाने (रा. हिंगणी ता. माहूर), संजय बालाजी शिंदे (रा. गोपाळ चावडी), संजय निवृत्ती जोंधळे (रा. नावघाट), आनंदा नागोराव हैबतकर (रा. गोपाळ चावडी) यांच्यावर अटकेची कारवाई केली.

यावेळी पथकाने ५ दुचाकी, मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ५ लाख ५ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्य जप्त केले. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# ज्येष्ठ नागरिकांना आता एसटी प्रवास सवलतीचे स्मार्ट कार्ड वैद्य रुग्णालयातूनही मिळणार -डॉ. हंसराज वैद्य

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहर व जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आता त्यांचे एसटीचे प्रवास सुविधा तथा सवलतीचे एनसीएमसी कार्ड (स्मार्ट कार्ड) दि. १० मे पासून दररोज वैद्य रुग्णालयातही मिळणार आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची काहीअंशी हेळसांड थांबणार आहे.

पूर्वी ही सवलत आधार कार्डावरच दिली जात होती. पण ती आता एनसीएमसी अर्थात स्मार्ट कार्ड धारकांनाच दिली जाणार आहे. ७५ वर्षावरील सर्व महिला-पुरुष ज्येष्ठ नागरिकांना हे कार्ड ज्यांच्याकडे असेल त्यांनाच ही सवलत आता यापुढे मिळणार आहे. या कार्डमुळे ६५ ते ७५ वर्षापर्यंतच्या सर्व स्त्री-पुरुष ज्येष्ठ नागरिकांच्या तिकिटावर पन्नास टक्के सवलत (सूट) मिळणार आहे. हे कार्ड्स मे अखेरपर्यंतच मिळणार आहेत. एसटीचे अधिकारी तथा एसटीचे एजंटस् स्वतः व्यक्तिशः दररोज वैद्य रुग्णालयात उपस्थित राहून इथेच ते कार्ड्स फक्त ज्येष्ठ नागरिकांनाच त्यांची नोंद घेऊन थेट वितरित तथा वाटप करणार आहेत. नवीन काडासाठी फक्त १९९ रुपये लागणार आहेत. जुन्या कार्डधारकांना मात्र फक्त १४९ रुपये लागणार आहेत. ही सोय फेस्कॉमचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे मुंबई यांच्या प्रयत्नामुळे उपलब्ध झाली आहे.

ज्येष्ठ नागरिकांनी येताना आपापले मूळ आधार कार्ड, मोबाईल फोन व जुन्या कार्डधारकांनी आपापले जुने कार्ड सोबत आणायचे आहेत. एसटी प्रवास सवलतीचे कार्ड पुढच्या महिन्यापासून देणे कदाचित बंद होण्याची शक्यता आहे.

तेव्हा ज्या ज्या ज्येष्ठ नागरिकांनी एसटी प्रवास सुविधाचे कार्ड काढलेले नसतील त्यांनी दररोज सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी साडेचार वाजे पर्यंतच कार्ड मिळवून घेण्यासाठी यावे व या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन डॉ. हंसराज वैद्य अध्यक्ष (९४२३१३८३८५), प्रभाकर कुंटूरकर सचिव (९६०४०६०९०२), गिरीश बाऱ्हाळे कोषाध्यक्ष, उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग ज्येष्ठ नागरिक संघ फेस्कॉम नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

### नांदा सौख्यभरे

**पाटील – शिंदे**

नांदेड येथील रहिवासी डॉ. सौ. कल्पना व श्री दिलीप पाटील यांचे कनिष्ठ सुपुत्र चि. हार्दिक यांचा शुभविवाह छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी सौ. शोभा व श्री प्रताप माधराव शिंदे यांची सुकन्या चि.सौ.कां. नंदिनी हिजसमवेत आज सोमवार, दि. ११ मे रोजी सकाळी ११.११ वाजता गुंडेगावकर मंगल कार्यालय उस्माननगर रोड, सिडको नांदेड येथे संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक




**नांदेड** – एम.आय.एम.चे राष्ट्रीय अध्यक्ष खा. असदुद्दीन ओवैसी हे छत्रपती संभाजीनगर येथे बैठकीसाठी आले होते. यावेळी नांदेड मनपाच्या विरोधी पक्षनेतेपदी मसूद अहेमद खान यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी खा. इम्तियाज जलील, वारीस पठाण, फेरोज लाला, स. मुजीब, स. मुक्तार, शमीम अब्दुल्ला, स. फसियोद्दीन, ॲड. नासेर, अब्दुल लतीफ यांच्यासह नगरसेवक व एमआयएमचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# पंचफुलाबाई सुंडगे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – श्रीमती पंचफुलाबाई राम राम सुंडगे यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.



सोमवार, दि. ११ मे रोजी सकाळी १० वा. नांदेडच्या डंकीन येथील वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, जावाई, नातू असा परिवार आहे.

# राज्यभर वीज कर्मचाऱ्यांचे बोनससाठी १४ मे रोजी निदर्शने

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्यातील तिन्ही वीज कंपन्यातील ८६ हजार कर्मचारी, अभियंते व अधिकारी बोनसच्या मागणी करीता राज्यभर १४ मे रोजी निदर्शने करणार असल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या निर्मिती,पारेषण व वितरण वीज कंपन्यामध्ये काम करणारे ८६ हजार कर्मचारी, अभियंते,अधिकारी व सहाय्यक यांना प्रत्येक वर्षी दिवाळीमध्ये बोनस व सानुग्रह अनुदान देण्यात येतो. यावर्षी सुद्धा बोनस व सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी देण्याबाबतची मागणी व प्रस्ताव तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेकरीता सादर केला.याच काळात वीज कंपनीतील कर्मचारी संघटनांनी म हावितरण कंपनीच्या व्यवस्थापनाने एकतर्फी सुरू केलेली पुनर्रचना,तिन्ही वीज कंपन्यात विविध मार्गाने सुरू असलेले खाजगीकरण, कंत्राटी कामगारांना कायम करणे व पेन्शन इत्यादी म ागण्या करीता संपाची नोटीस दिली होती.दिनांक ९ ऑक्टोंबर २०२५ रोजी राज्यातील हजारो वीज कामगार या मागण्यासाठी २४ तास संपावर गेले. कर्मचारी संपावर गेले हा राग मनात धरून महावितरण कंपनीच्या अध्यक्षांनी बोनसचा प्रस्ताव प्रलंबित ठेवला असा आरोप कामगार संघटनांनी केला आहे.कर्मचारी ९ आक्टोंबरला १ दिवस संपावर गेले असताना दोन दिवसाचे वेतन चुकीच्या पद्धतीने कपात केले तसेच कंपनीचे सिम कार्ड जमा केले म्हणून सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून वन थर्ड एवढी रक्कम कपात करण्यात येत आहे. याला तीव्र विरोध कामगार संघटनांनी केलेला आहे.

संपाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीचे पदाधिकारी यांची मा.आभा शुक्ला अपर मुख्य सचिव (ऊर्जा) व तिन्ही वीज कंपन्यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी बैठक झाली.बैठकीत बोनसच्या मागणीसह वरील प्रलंबित प्रश्नावर चर्चा झाली. या चर्चेत व्यवस्थापनाने मार्च २०२६ मध्ये १०० % वसुलीचे लक्ष पूर्ण करावे, सानुग्रह अनुदान देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. दि.२७ एप्रिल २०२६ रोजी महावितरण कंपनीचे अध्यक्ष लोकेशचंद्र यांनी कामगार संघटनांची बैठक घेतली.

# अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध उस्माननगर पोलिसांची कारवाई; १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –अवैध वाहतुकी विरोधात उस्माननगर पोलिसांनी कारवाई करीत दोन ट्रॅक्टरसह तब्बल १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई सोमवारी पहाटे ५.४० वाजताच्या सुमारास गोविंद मोहळे येथील शिवारात करण्यात आली.



पोलीस उपअधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. यावेळी अवैधरित्या रेतीची वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडण्यात आले. या कारवाईत एकूण ५ ब्रास रेतीसह दोन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालामध्ये एका ट्रॅक्टरची किंमत १५ लाख रुपये तर रेतीची किंमत २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. एकूण १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस ठाणे उस्मानगर येथे गुन्हा क्रमांक ९३/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३(५) तसेच सहकलम ४, २१ गौण खनिज अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी लोकेश शिवाजी हंबर्डे, (रा. वाका ता. लोहा), माधव शिवाजी वडवळे (रा. कापसी ता. लोहा) व उत्तम बाबा ढगे (रा. येळी ता.लोहा) या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक गजानन गाडेकर, पोलीस अंमलदार सय्यद मकदूम सय्यद महेबूब साब, चिंचोरे, कल्लेवार, तुकाराम जुन्ने व माधव पवार यांनी पार पाडली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पथकाचे कौतुक केले आहे.

# हिंदु खाटीक समाजाची लातूर येथे मराठवाड्याची बैठक

**लातूर/नांदेड (प्रतिनिधी)**– मराठवाड्यातील हिंदू खाटीक समाजाची बैठक शनिवार, दि. ९ मे रोजी डॉ. भालचंद्र ब्लड बँक लातूर येथे ॲड. व्यंकटराव बेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स पुणे येथील प्रा. डॉ. प्रशांत बनसोडे यांची उपस्थिती होती. बैठकीचे सुरुवातीस अध्यक्ष ॲड. व्यंकटराव बेंद्रे, प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रशांत बनसोडे यांचे शाल, श्रीफळ, बुके देऊन स्वागत करण्यात आले.




अध्यक्षीय मनोगतात ॲड. व्यंकटराव बेंद्रे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील विविध भागात खाटीक समाजास विविध स्थानिक नावाने ओळखले जाते. जसे मराठवाड्यात कलाल, खाटीक कलाल, तर उर्वरित भागात क्षत्रिय खाटीक, मराठा खाटीक, धनगर खाटीक, लाड खाटीक, सूर्यवंशी खाटीक, बक्कर कसाब (तत्कालीन उर्दू फसली भाषेत) ही सामाजिक ओळख अशिक्षितपणामुळे व अश्यपृश्यता टाळण्यासाठी जात लपविली जात असत. जे मूळ मांस विक्रीचा व्यवसाय करणारे रक्त नातेसंबंधित एकमेकांचे नातेवाईक आहेत. चुकीच्या नोंदीमुळे गोरगरीब समाजबांधवांना जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र मिळण्याची अडचण दूर व्हावी म्हणून हा लढा सुरू केला. त्यात स्व. अशोक पेंढारी, विनोद गायकवाड, स्व. रत्नाकर लाड आदींनी सहकार्य केले. हा लढा पुढे घेऊन जावयाचा असून,हे समाज ऋण फेडण्यासाठी हा लढा सुरू असून त्यात सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस डॉ. प्रशांत बनसोडे यांनी खाटीक जातीचे निकषांच्या आधारावर योग्य संशोधन होऊन सर्व समावेशक सर्वांना न्याय मिळण्यासाठी योग्य ते महसुली, शैक्षणिक पुरावे व माहिती उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले.

यावेळी ओमप्रकाश आर्य, लक्ष्मण कल्याणकर, गोविंद वंजारे, डॉ. प्रमोद हातांगले आदींनी समयोचित मनोगत व्यक्त केले. बैठकीला समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. प्रदीपसिंह गंगणे यांनी केले तर आभार डॉ. संतोष जमदाडे यांनी मानले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com